। लातूर । वर्ष ३४ वे । अंक २७३ वा । शुक्रवार, दिनांक २३ जानेवारी २०२६ । पृष्ठे ६ । किंमत १ रू.

RNI 47034/64

# लातूर समाचार

LATUR SAMACHAR

Email-dainiklatursamachar@gmail.com

(सांज दैनिक)

प्रकाशन: लातूर

पोष्ट परवाना L2/RNP/OMD- 52/24-26

संस्थापक : स्व.शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक) कार्यकारी संपादक : शिवाजी दयानंद जडे

# प्रजासत्ताक दिनी कर्तव्यपथावर महाराष्ट्राच्या सांस्कृतिक वैभवाचा जयघोष निनादणार

## गणेशोत्सव: 'आत्मनिर्भरतेचे प्रतीक' चित्ररथ सज्ज

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था: भारतीय प्रजासत्ताक दिनाच्या ७७ व्या वर्धापनदिनानिमित्त राजधानीतील कर्तव्यपथावर होणाऱ्या भव्य पथसंचलनासाठी महाराष्ट्राचा चित्ररथ सज्ज झाला असून, यंदा राज्याच्या वतीने 'गणेशोत्सव: आत्मनिर्भरतेचे प्रतीक' या संकल्पनेवर आधारित चित्ररथ सादर केला जाणार आहे. राष्ट्रीय गीत 'वंदे मातरम्'ला १५० वर्षे पूर्ण होत असल्याच्या ऐतिहासिक पार्श्वभूमीवर यंदाचा सोहळा विशेष ठरणार आहे. युरोपियन कौन्सिलचे अध्यक्ष अँटोनियो कोस्टा आणि युरोपियन कमिशनच्या अध्यक्षा उर्सुला वॉन डेर लेयन हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार असून, त्यांच्या उपस्थितीत संचलनात सहभागी होणारा महाराष्ट्राचा हा चित्ररथ राज्याची प्रदीर्घ परंपरा आणि वाढत्या आर्थिक सामर्थ्याचे दर्शन अवघ्या जगाला घडवेल.**

लोकमान्य टिळकांनी सार्वजनिक गणेशोत्सवातून ज्या सामाजिक क्रांतीची मुहूर्तमेढ रोवली, तिच चळवळ आज आधुनिक भारताला कशी 'आत्मनिर्भर' बनवत आहे, याचे प्रभावी चित्रण या चित्ररथात करण्यात आले आहे. गणेशोत्सवाच्या माध्यमातून होणारी कोट्यवधींची आर्थिक उलाढाल, मूर्तिकार आणि सजावट कलाकारांना मिळणारा शाश्वत रोजगार आणि त्यातून विणली गेलेली आर्थिक साखळी या चित्ररथाच्या केंद्रस्थानी आहे. महाराष्ट्र शासनाने वर्ष २०२५ पासून सार्वजनिक गणेशोत्सव हा 'राज्य महोत्सव' म्हणून साजरा करण्यास सुरुवात केली असून, या उत्सवामुळे केवळ सांस्कृतिकच नव्हे, तर पर्यावरणीय आणि आर्थिक आत्मनिर्भरतेसही कशी चालना मिळते, हे या चित्ररथातून ठळकपणे मांडण्यात आले आहे.




**कसा असेल चित्ररथ?**

महाराष्ट्राच्या या चित्ररथाची रचना अत्यंत कलात्मक आणि डोळ्यांचे पारणे फेडणारी आहे. चित्ररथाच्या अग्रभागी महाराष्ट्राच्या ऊर्जेचे प्रतीक असलेला एक भव्य ढोल आणि तो वाजवणारी पारंपारिक वेशभूषेतील महिला राज्याच्या प्रबळ स्त्रीशक्तीचे दर्शन घडवेल. चित्ररथाच्या मध्यभागात गणपतीची देखणी मूर्ती साकारणारा मूर्तिकार आणि विसर्जनासाठी निघालेला गणेशभक्त दर्शवण्यात आला आहे. चित्ररथाच्या शेवटच्या भागात महाराष्ट्राचे श्रद्धास्थान असलेल्या अष्टविनायक मंदिराची भव्य प्रतिकृती साकारण्यात आली असून, इतर सांस्कृतिक बाबींचेही बारकाव्यांसह दर्शन घडवण्यात आले आहे. चित्ररथाच्या दोन्ही बाजूस पारंपारिक नऊवारी साडी परिधान केलेल्या महिलांचे लेझीम पथक असेल.

यंदाचा हा सोहळा 'जनभागीदारी'वर आधारित असून, संचलनानंतर २६ ते ३१ जानेवारी दरम्यान लाल किल्ल्यावर आयोजित होणाऱ्या 'भारत पर्व'मध्ये देखील देशवासियांना महाराष्ट्राच्या या सांस्कृतिक समृद्धीचा आणि आत्मनिर्भरतेच्या प्रवासाचा आनंद घेता येणार आहे.

# अ‍ॅमेझॉनच्या कर्मचाऱ्यांची चिंता वाढणार

## तब्बल १४,००० कर्मचाऱ्यांना देणार नारळ? भारतीयांना बसणार फटका?

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था** : सध्या जगभर मंदीचे सावट असून अनेक दिग्गज कंपन्या कर्मचारी कपात करत आहे. यापूर्वी ॲपल, सॅमसंग सारख्या दिग्गज टेक कंपन्यांनी जगभरातील युनिटमधून मोठ्या प्रमाणात कर्मचाऱ्यांना नारळ दिला आहे. इन्फोसिस, टीसीएस सारख्या भारतीय कंपन्यांचाही यात समावेश आहे. यामध्ये आणखी एका मोठ्या कंपनीची भर पडणार आहे. ई-कॉमर्स क्षेत्रातील सर्वात मोठी कंपनी असलेल्या मेझॉनने कर्मचारी कपातीची मोठी घोषणा केली. यामध्ये भारतीय कर्मचाऱ्यांचाही समावेश असू शकतो.




**१४००० कर्मचारी होणार बेरोजगार?**

खर्चात कपात करण्यासाठी ॲमेझॉन यावर्षी हजारो कर्मचाऱ्यांना कामावरून काढण्याची शक्यता आहे. कंपनी यावर्षी सुमारे १३% कर्मचारी कमी कपात करण्याचा अंदाज आहे. त्यानुसार, तब्बल १४,००० कर्मचाऱ्यांना कामावरुन काढले जाऊ शकते. एआयच्या आव्हानांचा सामना करण्यासाठी आणि जास्तीत जास्त नफा मिळवण्यावर कंपनीने हा निर्णय घेतला असल्याचे बोलले जात आहे.

फायनान्शियल एक्स्प्रेसच्या अहवालानुसार, ॲमेझॉन नोकर कपातीची लवकरच घोषणा करण्याची शक्यता आहे. यानंतर कंपनीला दरवर्षी सुमारे २.१ ते ३.६ अब्ज अमेरिकन डॉलर बचत करण्यात मदत होईल. या टाळेबंदीचा जागतिक कामगारांवर परिणाम होईल. एकूण कर्मचाऱ्यांची संख्या १,०५,७७० वरून ९१,९३६ पर्यंत कमी होईल. कंपनीमध्ये दरवर्षी अशा प्रकारे नोकर कपात केली जाते. उत्पादन क्षमता वाढवणे आणि पुनर्रचना करणे हा या योजनेचा भाग आहे.

ॲमेझॉनचे सीईओ अँडी जॅसी यांनी ई-कॉमर्स दिग्गज कंपनीची कार्यक्षमता वाढवण्यासाठी आणि कर्मचाऱ्यांना कामावरून काढण्याची प्रक्रिया सुलभ करण्यासाठी एक धोरण जाहीर केले. अहवालानुसार, अँडी जॅसी यांनी २०२५ च्या पहिल्या तिमाहीत व्यवस्थापकांना वैयक्तिक योगदान १५% ने वाढवण्याची योजना शेअर केली. टाळेबंदीमुळे कर्मचारी संख्या कमी करण्यास आणि कामकाजाला गती देण्यास मदत होईल, असं मत अँडी जॅसी यांनी व्यक्त केलं.

या अहवालात मॉर्गन स्टॅनलीच्या अहवालाचा हवाला देण्यात आला आहे. त्यानुसार, अमेझॉनमधील नोकर कपातीचा परिणाम पुढील वर्षी सुमारे १३,८४३ कर्मचाऱ्यांवर होऊ शकतो. या निर्णयामुळे कंपनीचा खर्च मोठ्या प्रमाणात वाचणार असून नफ्यात वाढ होईल. नोकर कपातीनंतर कंपनी पगार रचनेचा आढावा घेणार असून वरिष्ठ पदांसाठी भरती मर्यादित करणार असल्याचे म्हटले जात आहे.

# निष्ठेला उमेदवारीची पावती आमदार अभिमन्यू पवारांनी खेळले 'निष्ठावंत कार्यकर्ता' कार्ड

**औसा/प्रतिनिधी:** आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर आमदार तथा निवडणूक प्रमुख अभिमन्यू पवार यांनी उमेदवार निवडीतून पक्षातील निष्ठावंत कार्यकर्त्यांना प्राधान्य देत राजकीय वर्तुळात स्पष्ट आणि ठोस संदेश दिला आहे. पक्ष संघटन, निष्ठा आणि तळागाळातील कार्यकर्त्यांचा सन्मान या त्रिसूत्रीवर त्यांनी उमेदवारीची रचना केली असल्याचे चित्र दिसून येत आहे. औसा विधानसभा मतदारसंघातील १२ जिल्हा परिषद व २४ पंचायत समिती अशा एकूण ३६ उमेदवारांपैकी तब्बल ३० उमेदवार हे पक्षाचे जुने, निष्ठावान कार्यकर्ते असून ४ उमेदवार नव्याने पक्षात प्रवेश केलेले आहेत, तर केवळ १ उमेदवार अराजकीय पार्श्वभूमीचा आहे. या निवडीमधून पक्षासाठी काम करणाऱ्यांनाच संधी हा स्पष्ट संदेश देण्यात आला आहे.



पक्षाच्या पहिल्या फळीतील संतोषअप्पा मुक्ता, काकासाहेब मोरे, ज्ञानेश्वर वाकडे, परमेश्वर धुमाळ, युवराज बिराजदार, अजय साळुंके, भागवत कांबळे, दिगंबर घोडके आणि शिवशरण पाटील या नऊ प्रमुख व अनुभवी कार्यकर्त्यांच्या दीर्घकालीन निष्ठेला न्याय देण्यात आला आहे. त्यामुळे पक्षातील ज्येष्ठ कार्यकर्त्यांमध्ये समाधानाची भावना व्यक्त होत असून संघटन अधिक मजबूत झाले आहे.

त्याचबरोबर रवीकुमार चिलमे, श्रीधर जाधव, राम बिराजदार, अमोल पाटील, नेताजी इंगळे, बालाजी माने यांच्यासह दहा पेक्षा अधिक युवा कार्यकर्त्यांना उमेदवारी देत आ. अभिमन्यू पवार यांनी नव्या पिढीला नेतृत्वाची संधी दिली आहे. यामुळे पक्षात नवचैतन्य निर्माण झाले असून तरुण कार्यकर्त्यांचा उत्साह द्विगुणित झाला आहे.

भाजपमध्ये बूथ यंत्रणेला अत्यंत महत्त्वाचे स्थान मानले जाते. त्याच धर्तीवर सदाशिव स्वामी आणि प्रतीक पाटील यांच्यासारख्या बूथ पातळीवर सातत्याने आणि निष्ठेने काम करणाऱ्या कार्यकर्त्यांनाही उमेदवारी देण्यात आली आहे. 'कार्यकर्ता हाच पक्षाचा खरा आधार आहे' हे या निर्णयातून पुन्हा एकदा अधोरेखित झाले असून, या मजबूत संघटनाच्या जोरावर पक्ष अधिक आत्मविश्वासाने निवडणुकीला सामोरे जाणार असल्याचे चित्र स्पष्ट झाले आहे.

# अल्पवयीन मुलीची छेड काढल्याबाबत आरोपीस न्यायालयाकडून सक्तमजुरीची शिक्षा

**लातूर/प्रतिनिधी:** अल्पवयीन मुलीवरील लैंगिक अत्याचार व छेडछाडीच्या गंभीर गुन्ह्यात मा. जिल्हा व सत्र न्यायालय, लातूर यांनी आरोपीस दोषी ठरवून सक्तमजुरी व दंडाची शिक्षा सुनावली असून, हा निर्णय समाजात महिलांच्या व बालकांच्या सुरक्षिततेसाठी महत्त्वाचा व दिशादर्शक ठरणारा आहे.

सदर प्रकरणाची थोडक्यात हकीकत अशी की, दि. १२/१२/२०२३ रोजी सायंकाळी सुमारे ०५.३० वाजण्याच्या सुमारास फिर्यादीची पीडित अल्पवयीन मुलगी ही जि. प. शाळेच्या मैदानात सायकल खेळत असताना परमेश्वर, वय २७ वर्षे, रा. बोरवटी, ता. जि. लातूर याने तिचा हात पकडून तिच्याशी लज्जा उत्पन्न होईल असे अश्लील वर्तन केले. सदर बाब पीडितेने घरी येऊन तिच्या आईला सांगितली. त्यानंतर पीडितेच्या आईने आरोपीस याबाबत जाब विचारला असता आरोपीने तिला जिवे मारण्याची धमकी दिली. याबाबत पीडितेच्या आईने दि. १३/१२/२०२३ रोजी लातूर ग्रामीण पोलीस ठाणे येथे तक्रार दिली. त्यावरून लातूर ग्रामीण पोलीस ठाणे येथे गुन्हा रजिस्टर नं. ३०५/२०२३ अन्वये भा.दं. वि. कलम ३५४, ३५४(ब), ५०४, ५०६ सह कलम ८, १२ बालकांचे लैंगिक अत्याचारापासून संरक्षण अधिनियम, २०१२ (POCSO Act) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला होता. सदर गुन्ह्याचा तपास तत्कालीन पोलीस उपनिरीक्षक शैलेश जाधव यांनी करून, सर्व आवश्यक पुरावे संकलित करून दोषारोपपत्र मा. न्यायालयात दाखल केले होते. खटल्यामध्ये प्रत्यक्षदर्शी साक्षीदार, सरकारी पंच, महानगरपालिका लातूर येथील जन्म-मृत्यू नोंदणी विभागातील अधिकारी तसेच तपासी अंमलदार यांच्या साक्षी महत्त्वपूर्ण ठरल्या.

सदर प्रकरणात जिल्हा सरकारी वकील श्री.संतोष देशपांडे यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष सरकारी अभियोक्ता श्री. मंगेश महिंद्रकर यांनी सरकारतर्फे प्रभावीपणे बाजू मांडली. दोन्ही बाजूंचा सखोल युक्तिवाद ऐकून मा. जिल्हा व सत्र न्यायालय-०३, लातूर येथील मा. न्यायमूर्ती श्री एस. व्ही. जाधव यांनी आरोपी परमेश्वर यास दोषी ठरवून दि. २१/०१/२०२६ रोजी खालीलप्रमाणे शिक्षा सुनावली आहे - भादंवि कलम ३५४(ब) सह POCSO Act कलम ८ अन्वये ०३ वर्षे सक्तमजुरी ३,०००/- रुपये दंड, भादंवि कलम ३५४ सह POCSO Act कलम १२ अन्वये ०१ वर्षे सक्तमजुरी १,०००/- रुपये दंड अशी एकूण कठोर शिक्षा सुनावून मा. न्यायालयाने महिलांच्या व बालकांच्या सुरक्षिततेबाबत धोरण स्पष्ट केले आहे.

सदर खटल्याच्या यशस्वी कामकाजासाठी पोलीस अधीक्षक श्री. अमोल तांबे, अपर पोलीस अधीक्षक श्री. मंगेश चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली ट्रायल मॉनिटरिंग सेलचे सहाय्यक पोलीस निरीक्षक श्री. शिवशंकर मनाळे, पोलीस अंमलदार सपोउनि कोटवाड, मपोशि काळे यांनी प्रभावीपणे काम पाहिले. त्यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे आणि समन्वयामुळे हा खटला यशस्वीरीत्या पूर्णत्वास गेला. महिलांवर व अल्पवयीन मुलींवर होणाऱ्या अत्याचारांविरोधात पोलीस प्रशासन व न्यायव्यवस्था अत्यंत संवेदनशील व कटिबद्ध असून, गुन्ह्यांमध्ये दोषींची सुटका नाही, हे या निकालातून स्पष्ट झाले आहे.

## कुजबुज

-डॉ. संजय जमदाडे



**१९ वर्षांनी चारी पिठांचे शंकराचार्य एकाच व्यासपीठावर येणार, दिल्लीत मोठे आंदोलन होणार...**



## चिमटा दयाचा

**एकाच घरात दोन उमेदवाऱ्या नकोत हे म्हटलात खरे ! मात्र एबी फॉर्म कोणी दिले?**

# ऑल इंडिया डिस्कॉम्स असोसिएशनच्या राष्ट्रीय परिषदेत महाराष्ट्रातील सौर कृषी क्रांतीचा गौरव

## केंद्रीय ऊर्जामंत्री श्री. मनोहर लाल यांच्या हस्ते महावितरणला पुरस्कार

**मुंबई/प्रतिनिधी:** शेतीसाठी वीजपुरवठा करणाऱ्या कृषी वीजवाहिन्यांच्या सौर ऊर्जीकरणात उल्लेखनीय कामगिरी केल्याबद्दल महावितरणचा ऑल इंडिया डिस्कॉम्स असोसिएशनच्या 'एडिकॉन-२०२६' या राष्ट्रीय परिषदेत बुधवारी (दि. २१) पुरस्काराने गौरव करण्यात आला. केंद्रीय ऊर्जामंत्री ना. श्री. मनोहर लाल यांच्याहस्ते महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. लोकेश चंद्र यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

केंद्रीय ऊर्जा मंत्रालयाच्या मार्गदर्शनाखाली देशातील वीज वितरण क्षेत्रातील विविध संस्थांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या ऑल इंडिया डिस्कॉम्स असोसिएशनच्या 'एडिकॉन-२०२६' राष्ट्रीय परिषदेचे नवी दिल्ली येथे दि. २१ व २२ ला आयोजन करण्यात आले. या परिषदेचे उद्घाटन केंद्रीय ऊर्जामंत्री ना. श्री. मनोहर लाल यांच्याहस्ते झाले. यावेळी व्यासपीठावर केंद्रीय ऊर्जा सचिव श्री. पंकज अग्रवाल, महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक आणि ऑल इंडिया डिस्कॉम्स असोसिएशनचे अध्यक्ष श्री. लोकेश चंद्र, सरचिटणीस डॉ. आशिष कुमार गोयल, महासंचालक श्री. आलोक कुमार यांची उपस्थिती होती. या परिषदेत देशभरातील वीज वितरण कंपन्यांचे पदाधिकारी व ऊर्जा क्षेत्रातील तज्ज्ञ प्रतिनिधी उपस्थित होते.




आशियातील सर्वात मोठा विकेंद्रीत सौर ऊर्जा प्रकल्प असलेल्या मुख्यमंत्री सौर कृषिवाहिनी योजना २.० चा 'एडिकॉन-२०२६' परिषदेत गौरव करण्यात आला. या योजनेत आतापर्यंत १९८५ कृषीवाहिन्यांचे सौर ऊर्जीकरण करण्यात आले असून राज्यातील तब्बल ८ लाखांपेक्षा अधिक शेतकऱ्यांना सिंचनासाठी दिवसा वीजपुरवठा उपलब्ध झाला आहे. या योजनेमुळे ६५ हजार कोटी रुपयांच्या गुंतवणुकीसह ७० हजारांवर ग्रामीण रोजगार निर्मिती सुरू आहे. तसेच महावितरणच्या वीज खरेदीमध्ये १० हजार कोटींच्या वार्षिक बचतीसोबतच क्रॉस सबसिडीमध्ये १३ हजार ५०० कोटींनी वार्षिक बोजा कमी होणार आहे. तब्बल २३१ विकासकांकडून या योजनेमध्ये १६ हजार मेगावॅटचे विकेंद्रित सौरऊर्जा प्रकल्प वेगाने उभारण्यात येत आहेत.

शेतकऱ्यांना प्रामुख्याने दिवसा व शाश्वत वीजपुरवठा करणे, वीज खरेदीचा व पर्यायाने अनुदानाचा बोजा कमी करणे, औद्योगिक व व्यावसायिक वीजदर कमी करणे यासाठी मुख्यमंत्री सौर कृषिवाहिनी योजना २.० अत्यंत उपयुक्त ठरत आहे.

# पथनाट्यातून सायबर क्राईमविरोधात लढा; चिंचोलीरावात जनजागृतीचा प्रभावी प्रयोग

**लातूर/प्रतिनिधी:** सध्या वाढत्या सायबर क्राईममुळे नागरिकांची मोठ्या प्रमाणावर आर्थिक फसवणूक होत असून, या धोक्याविषयी जनजागृती करणे काळाची गरज बनली आहे. याच उद्देशाने दयानंद वाणिज्य महाविद्यालय, लातूर यांच्या बँकिंग अँड इन्शुरन्स समितीच्या वतीने राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या विशेष वार्षिक युवक शिबिरादरम्यान मौजे चिंचोलीराव येथे 'वन-डे बँक एक्झिबिशन ४.० (दत्तक गावात बँकिंग कार्यपद्धती जागरुकतेकडे एक पाऊल)' या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले.या उपक्रमात विद्यार्थ्यांनी पथनाट्याच्या माध्यमातून सायबर क्राईम कसा घडतो, ऑनलाईन फसवणुकीच्या विविध पद्धती कोणत्या आहेत आणि त्यापासून स्वतःचा बचाव कसा करावा याबाबत प्रभावी सादरीकरण केले. मोबाईलवर येणारे फसवे कॉल, ओटीपी शेअर केल्याने होणारी फसवणूक, बनावट लिंक व ॲप्सच्या माध्यमातून होणारे आर्थिक नुकसान याबाबत विद्यार्थ्यांनी जनतेचे लक्ष वेधले. तसेच विविध बँकिंग सेवांचे प्रात्यक्षिक सादर करत सुरक्षित डिजिटल व्यवहारांचे महत्त्व पटवून दिले. दयानंद वाणिज्य महाविद्यालयाचे राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे विशेष वार्षिक युवक शिबीर सध्या चिंचोलीराव येथे सुरू आहे.

सून, या शिबिराअंतर्गत विविध सामाजिक व प्रबोधनात्मक विषयांवर कार्यक्रम राबविण्यात येत आहेत. याच अनुषंगाने बँकिंग व इन्शुरन्स विभागाच्या विद्यार्थ्यांनी रॅली, पथनाट्य आणि प्रत्यक्ष संवादातून सायबर क्राईमविरोधात जनजागृती केली. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. प्रशांत मान्नीकर, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक डॉ. बाळासाहेब चव्हाण, राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे कार्यक्रमाधिकारी डॉ. विशाल वर्मा यांच्या मार्गदर्शनाखाली बँकिंग अँड इन्शुरन्स समन्वयक डॉ. निखिल व्यास, फॉरेन ट्रेड समन्वयक डॉ. रूपा गिल्डा, प्रा. योगेश शर्मा, प्रा. निलेश मंत्री, डॉ. लता जाधव, प्रा. ऐश्वर्या कुलकर्णी, प्रा. मेरवान राठोड यांनी विशेष परिश्रम घेतले. यावेळी ग्रामस्थांसह विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

ओ३म् भूर्भुवः स्वः ।
तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो नः प्रचोदयात् ।।

लातूर समाचार

## जनतेला स्वावलंबी बनवा

राज्यातील जनतेला स्वावलंबी बनवा. तुटपुंजी मदतीने आळसी बनवू नका. देशात सत्तेसाठी जी अक्कल लढविली जाते ती आगामी काळात घातक आहे. स्वयंपूर्ण व स्वावलंबनाची मोठी गरज आहे. हे ब्रिद पुर्वी भारताचे होते ते आता लोप पावत आहे. कालांतराने या दोन्ही बाबी विसरल्या गेल्या आहेत. त्यामुळे दारिद्रय आले. त्यातुन भ्रष्टाचार सुरु झाला. स्वावलंबन कधीही स्वाभिमानी बनविते. स्वावलंबी होणे म्हणजे आपणच आपले कर्तृत्व सिद्द करण्यासारखे आहे. आता कोणालाही आळशी किंवा कामचोर बनवू नये. हे घातक आहे. आज जे देश जगाच्या पाठीवर नावाजलेले आहेत. त्या देशातील जनता स्वावलंबी आहेत. कष्ठाळू आहेत. मोफत मागत नाहीत तर कष्टाचा मोबादला मागतात. जपान, जर्मन आदि राष्ट्र फिनिक्स पक्षाप्रमाणे राखेतून विश्व निर्माण करणारे आहेत. कष्ठातून जपान पुढे गेला आहे. इतिहास जाणून घेतला पाहिजे. इतिहास मार्ग सांगतो. घडलेल्याबाबी सांगातो. त्यामुळे विचार न केलेल्या बाबीचा परिणाम मोठा होतो. मुळात आज ज्या काही तुटपुंज्या मदतीच्या योजना आहेत. त्या बंद केल्या पाहिजेत. ज्यांना खरीच गरज आहे. अशा लाभार्थींना मदत दिली पाहिजे. गरजवंतास आपल्या देशात मदत मिळत नाही, इतरच योजना लाटतात. गरज नसताना काही योजना राबविल्या जातात. पहिल्यांदा आपल्या देशात गरीब आहेत का? हा सर्वात महत्त्वाचा व संशोधनाचा विषय आहे. पुर्वी जसे गरीब मागत फिरत होते ती परिस्थिती दिसून येत नाही. आता ज्यांना भिखारी म्हणतो ते जवळपास संपले आहेत. याचा अर्थ गरीबीचे प्रमाण अल्प आहे. असो त्यापेक्षाही सर्वात महत्वाचे म्हणजे आज सर्वजन कमवणारे आहेत. घरा-घरात कोणीही अशिक्षित नाही. प्रत्येक कुटुब शिकलेले आहे. त्यामुळे हाताला कामा मिळते. यात ही काम न करणाऱ्याची संख्या अधिक आहे. हाताला काम नको. अंगमेहनत नको. बसून खाणाऱ्याची संख्या कमी नाही. हे उघड आहे. त्यामुळे अशा बाबीला काहीच करू शकत नाही. जे काम करू शकतात. त्यांना मदतीचा हात पुढे केला पाहिजे. काही वेळा आपल्याला निवडणुकीत मते मिळतात म्हणून कांही योजना चालू केली जाते. काही राज्यात आपल्याला सत्ता मिळावी म्हणून काही योजना चालू केल्या आहेत. यापासून किती राज्याचे नुकसान होते. कर्जबाजारी होत आहोत, याकडे दुर्लक्ष केले जाते. त्यामुळे राज्यात असो किंवा देशात अशा योजना चालू कराव्यात की, भारतीय व्यक्ती स्वावलंबी बनेल. कष्ठाळू बनेल. आज चीनमध्ये कोणीही बसून खात नाहीत. महिला बँक, पोष्ट आदि कमी श्रमाचे काम करतात तर पुरूष आवजड कामे करतात. मुले देशाचे नाव उज्वल करण्यासाठी खेळात प्राविण्य मिळवितात. तसे भारतात का होत नाही. सरकारने द्यावे व देतच राहावे अशी मानसिकता निर्माण झालेली आहे. सरकार देते म्हणजे म्हणजे काही तरी निस्वार्थासाठी देत आहे का? याचा विचार केला जात नाहीत. वास्तविक सवलती घेणाऱ्यांनी विचार केला पाहिजे. आपण जे सरकारकडून घेत आहोत त्या बदल्यात सरकारला काय-काय परत करीत आहोत. विचार केला तर कळून येणार आहे. कारण जे अनेक कर भरतो, त्यातूनच विविध मार्गाने परत मिळतात. सर्वजन ग्रामपंचायत असो किंवा शहरी भागात राहणारे घरमालक असोत ते मालमत्ता कर भरतात. नळाचा टॅक्स भरतात. व्यावसायिक असेलतर जीएसटी भरतो. वीजे घेतो ती मोफत नाही. त्याचाही युनिट प्रमाणे भाडे देतो. रोड टॅक्स देतो. परवाला नवीन नंबरची गाड्यासाठी प्लेट सर्व गाड्यांमालकांनी पैसे ऑनलाईन भरून नंबर प्लेटा घेतल्या व त्या गाडीला लावल्या. त्याच प्रमाणे साधे विचार करा. एखाद्या विभागात नोकरीसाठी अर्ज केला तर ऑनलाईन फीस भरावी लागते. शंभरजागेसाठी लाखोंच्यासंख्येने अर्ज दाखल होतात. त्या सोबत ऑनलाईन फी जमा करावी लागते. ही लाखोंरूपयाच्या स्वरूपात संबंधित विभागात जमा होते. नोकरी लागते का नाही तो पुढचा भाग! मुलाखती होतात का आचारसंहीतेत आडकतात हा दुसरा भाग!! मात्र लाखोंच्या संख्येने महसुल जमा होतो. हा जमा झालेला पैसा, जनतेसाठीच फिरवला जातो. सर्वसाधारण जनता मालमत्ता कर देते मात्र नेते मंडळींला माफ असते. विमान, रेल्वे सेवा. आलिशान बंगलो बिन कराचे असतात का नाही? मुळात जनतेनी कोणत्याही सवलती नको असे म्हटले पाहिजे. आम्हाला देता ते आमच्या कर रूपाने जमा झालेले देतात. काही उपकार करीत नाहीत. त्यामुळे जनता विचारी नाही. दिड हजारात सध्याच्या महागाईत काय होते. साधे दुधाचे बिल अदा होत नाहीत. विचार करीत नाहीत. थोड्याशा अतिषाला बळी पडत असाल तर सावध झाले पाहिजे. द्यायचे झाले तर आरोग्य व शिक्षण मोफत द्या. म्हणजे शिक्षण सम्राट देशोधडीला लागतील. त्यामुळे आरोग्य व शिक्षण मोफत दिले जात नाही. सर्व कर रद्द करा. एकच कर ठेवा तो म्हणजे कोणतीही वस्तू खरेदी केली तर त्यावर माफक कर लावा. बाकीचे कर नकोत. एकतर प्रामाणिक कर भरणारे किती आहेत, कर बुडवुन पळून जाणारे किती आहेत. याचा कोठेतरी विचार केला पाहिजे. अनेक करामुळे सर्वसाधारण नागरिक परेशान आहे. हा कर तो कर कशासाठी? एकच कर रचना असावी. कोणतीही वस्तू खरेदी करताना कर भरूनच वस्तू खरेदी करावी. यामुळे एक सुत्रता येईल. अनेक कर वसुलीचे कार्यालये आहेत ते बंद केली तरी चालेल. प्रत्येक बाबीला कर लागत असेल तर चोऱ्या करण्याचे प्रमाण वाढते. सर्वात मोठा धोका हा भ्रष्टाचाराचा आहे. तो वाढत आहे. लबाड बोलणाऱ्याची संख्या अधिक आहे. लबाड बोलणाऱ्यास शिक्षा नाही. शासकिय कार्यालयात जावा. महसुल विभागात गेल्यास ज्यावेळेस काम होईल सांगितले जाते त्यावेळी झाले का? दिरंगाई केली तर ही लबाड बाब आहे. याला शिक्षा नाही. त्यामुळे कार्यालयात खेटे मारणारे कमी नाहीत. वेळेवर येवून जबाबदारी पार पाडणारे किती दिसून येतात. विचार केला पाहिजे. जी चुकीची पद्धती ब्रिटीशांनी लागू केल्या, त्याच भारतातील स्वार्थी मंडळींनी चालू ठेवल्या. याबाबत पुर्नविचार केला पाहिजे. जे चुकीचे आहे ते नको. त्यामुळे सरकार देते म्हणजे उपकार करते असे होत नाही. बदल होणे अशक्य आहे, त्यामुळे भारतीय प्रत्येक नागरिकांनी स्वावलंबी बनावे. कष्ठाळू बनावे हा मंत्र अंगीकारलाच पाहिजे.

# श्री गुरु तेग बहादूर: मानवजातीचे खरे तारणहार

'हिंद दी चादर' श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांच्या शहिदीला ३५० वर्ष पुर्ण होत असल्याने महाराष्ट्र शासन आणि श्री गुरु तेग बहादूर साहिबजी ३५० वा शहिदी समागम राज्यस्तरीय समिती मार्फत नांदेड येथे २४ व २५ जानेवारी २०२६ रोजी कार्यक्रम होत आहे. या निमित्ताने श्री गुरु तेग बहादूरजी यांच्या मानवजातीच्या कल्याणासाठी केलेल्या अनमोल कार्याची ही माहिती...



महान योद्धा, आध्यात्मिक व्यक्तिमत्त्व आणि मातृभूमीचे प्रेमी नववे शीख गुरू श्री गुरु तेग बहादूरजी यांनी केलेल्या सर्वोच्च बलिदानाची मानवता सदैव ऋणी राहील. त्यांनी विश्वबंधुता आणि धार्मिक स्वातंत्र्याचा संदेश दिला. धर्म, मातृभूमी आणि लोकांच्या हक्कांसाठी त्यांनी जाती-धर्माचा विचार न करता सर्वस्वाचा त्याग केला. म्हणूनच त्यांना 'हिंद दी चादर' या दुर्मिळ सन्मानाने गौरवण्यात आले. आपण श्री गुरु तेग बहादूरजींचा ३५० वा शहिदी समागम वर्ष साजरा करत असताना, धार्मिक स्वातंत्र्याचे महत्त्व आणि मानवजातीच्या व मातृभूमीच्या कल्याणाविषयी शिकवण देणाऱ्या त्यांच्या महान आदर्शांना पुन्हा समर्पित करणे आवश्यक आहे.

अतुलनीय श्री गुरु तेग बहादूरजींनी आपल्याला निर्भयपणे मुक्त जीवन जगण्याची शिकवण दिली. मुघल सम्राट औरंगजेबाने त्यांच्यावर आणि त्यांच्या कुटुंबावर केलेल्या अत्यंत छळास ते शरण गेले नाहीत, तर दैवी शांततेने तो सहन केला. त्यागमल ते तेग बहादूर असे झालेले त्यांचे परिवर्तन मानवी इतिहासात फार कमी समांतर असलेली धार्मिक दृढता, औचित्य, नैतिकता आणि शौर्याची कथा आहे. त्यांनी आपल्या प्राणांची आहुती दिली, पण सत्याचा मार्ग सोडला नाही. त्यांच्या देवत्वाची अशी शक्ती होती की जेव्हा त्यांच्या शिष्यांना त्यांच्या समोर मारण्यात आले, तेव्हा ते खोल ध्यानात राहिले. जेव्हा त्यांनी स्वतः परम त्याग केला, तेव्हाही ते ध्यानात मग्न होते. श्री गुरु तेग बहादूरजी म्हणाले की धर्म हा केवळ पूजा-पाठ नसून कर्तव्य आहे आणि एक आदर्श जीवनपद्धती आहे.

आजच्या तरुण पिढीने श्री गुरु तेग बहादूरजींच्या जीवनातून, चारित्र्यातून आणि त्यागातून प्रेरणा घेऊन मानवता आणि नैतिक मूल्ये अंगीकारण्याची गरज आहे, जेणेकरून भारत पुन्हा विश्वगुरू होईल. अत्याचार आणि अन्यायापुढे झुकण्यास त्यांनी ठाम नकार दिला. त्यांनी आदर्श आणि तत्त्वांच्या मार्गावर चालण्याची निवड केली. काश्मिरी पंडितांचे एक शिष्टमंडळ श्री गुरु तेग बहादूरजींना भेटण्यासाठी आजच्या श्री आनंदपूर साहिब येथे आले, ज्याला चक्क नानकी असेही म्हणतात. त्यांचे म्हणणे धीराने ऐकून घेतल्यानंतर, त्यांनी त्यांना औरंगजेबाला किंवा त्याच्या माणसांना सांगण्यास सांगितले की जर त्यांचे गुरू धर्म सोडतील, तरच ते आपला धर्म सोडतील.

त्यानंतर औरंगजेबाने केलेले कारनामे इतके भयानक होते की आजही त्यांची आठवण झाल्यावर अंगावर काटा उभा राहतो. श्री गुरु तेग बहादूरजी आणि त्यांच्या तीन भक्तांना -भाई सती दास, भाई मती दास आणि भाई दयाला - बंदिवान करण्यात आले. त्यांनी इस्लाम स्वीकारण्यास नकार दिल्यावर त्या उदात्त त्रिकूटांना त्यांच्या गुरूंसमोर फाशी देण्यात आले. त्यांनी धर्मासाठी सर्वोच्च बलिदान दिले. इ.स. १६७५ मध्ये श्री गुरु तेग बहादूरजींनी अत्यंत शांतपणे हौतात्म्य पत्करले. जुन्या दिल्लीतील चांदणी चौकातील गुरुद्वारा शीशगंज साहिब हे 'त्याग' आणि 'बलिदान' यांच्या अंतिम गाथेचे प्रतीक आहे, ज्याला मानवी इतिहासात तोड नाही. भाई जैता सिंग यांनी श्री गुरु तेग बहादूरजींचे पवित्र शीश श्री आनंदपूर साहिब येथे नेले, जे जगभरातील शीखांसाठी सर्वात पवित्र स्थळांपैकी एक आहे.

त्यांच्या बलिदानामुळे 'वसुधैव कुटुंबकम्' या तत्त्वावर आधारित प्राचीन सभ्यता आणि संस्कृती केवळ नष्ट होण्यापासून वाचली नाही, तर एक दृढ आणि सर्वसमावेशक राष्ट्र म्हणून उदयास येण्याच्या आपल्या सामूहिक प्रयत्नांमध्ये तो एक ऐतिहासिक टप्पा ठरला. शीख धर्माचा पाया हा मानवी इतिहासातील सामान्य विकास नव्हता, तर तो सर्व प्रकारच्या अत्याचारांविरुद्ध मानवतेची ढाल बनला. ही एक महान परंपरा होती आणि आजही आहे. नववे शीख गुरू श्री गुरु तेग बहादूरजींनी केवळ लोकांचा धर्मरक्षणाचा संकल्प जपला आणि बळकट केला नाही, तर शीख धर्माला महानतेच्या पुढील स्तरावर नेले.

श्री गुरु तेग बहादूरजींना माहीत होते की त्यांच्या भक्तांनी कोणताही पश्चात्ताप न करता धर्मासाठी किंमत मोजली. त्यांनी सर्व मोह नाकारले, सर्व वेदना आणि त्रास सहन केले, पण अश्रू ढाळले नाहीत. धर्मकार्यावरील त्यांची बांधिलकी आणि श्रद्धा अतूट होती. श्री गुरु तेग बहादूर यांचे जीवन हे धर्म आणि मानवजातीच्या कल्याणासाठी केलेल्या अतुलनीय बलिदानांचे सर्वोच्च उदाहरण आहे. औरंगजेबाच्या क्रूरतेपुढे त्यांनी कधीही शरणागती पत्करली नाही. प्रत्येक प्रश्नाला त्यांचे उत्तर स्पष्ट होते - मी शीख आहे आणि शीखच राहणार!

श्री गुरु तेग बहादूरजींच्या शिकवणीतून आणि त्यागातून आपल्याला अनेक आणि बहुआयामी धडे मिळतात. त्यांचा त्याग, सत्यावरील अढळ विश्वास, अहिंसा आणि सर्वांप्रती परोपकारी दृष्टीकोन आजही आपल्यासाठी प्रेरणादायी आहे. अंधश्रद्धा, जातीय भेदभाव आणि अस्पृश्यतेविरुद्ध त्यांनी संघर्ष केला, जेणेकरून प्रत्येक मानवाला आपल्या आवडीचे जीवन जगता येईल. धर्म हे सर्वांचे कर्तव्य आहे. खरा धर्म आपल्याला सर्वांशी चांगले वर्तन करण्याची आणि समाजाची शक्य तितकी सेवा करण्याची शिकवण देतो. त्यांनी दुर्बल आणि वंचितांच्या बाजूने ठामपणे उभे राहिले. त्यांचे पुत्र श्री गुरु गोविंद सिंगजी यांनी केवळ वडिलांची तत्त्वे आणि मूल्ये जपली नाहीत, तर खालसा निर्माण करून त्यांना पुढे नेले, जो धार्मिकता आणि न्यायासाठी लढण्याचे प्रतीक आहे.

आपण श्री गुरु तेग बहादूरजींचे हे महान वचन सदैव लक्षात ठेवले पाहिजे -आपण आपले जीवन सुख-दुःखात तसेच मान-अपमानात समान भावनेने जगले पाहिजे. त्यांच्या शिकवणीतून जीवनाचा उद्देश तसेच समता, समरसता आणि त्याग यांचे महत्त्व अधोरेखित होते. श्री गुरु तेग बहादूरजींचे महान शब्द हे मानवतेसाठी ऊर्जा आणि ज्ञानाचे चिरंतन स्रोत आहेत. गुरूंच्या शब्दांच्या मधुर पठणाचा भक्तांवर खोल परिणाम होत असे. त्यांनी अत्यंत शांततापूर्ण आणि मानवतावादी मार्गाने निरंकुश व धर्मांध शासकाशी संघर्ष केला. त्यांची शिकवण कालातीत आहे आणि येणाऱ्या पिढ्यांना सदैव प्रेरणा देत राहील. श्री गुरु तेग बहादूर यांचे जीवन आपल्याला प्रत्येक परिस्थितीला शांततेने आणि खंबीरतेने सामोरे जाण्याची तसेच सौहार्द, न्याय, समता आणि समरसतेवर आधारित सामाजिक व्यवस्था निर्माण करण्याची प्रेरणा देते.

**अनिल आलुरकर**
**उपसंचालक (माहिती)**
**विभागीय माहिती कार्यालय, अमरावती**

## शहीदी समागम कार्यक्रमानिमित्त २४ जानेवारी रोजी भव्य मिरवणूक

### मिरवणूकीवर हेलिकॉप्टरने पुष्पवृष्टी व फुलांची सजावट

**नांदेड प्रतिनिधी:** नांदेड येथे श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांच्या ३५० व्या शहीदी समागम वर्षानिमित्त २४ व २५ जानेवारी रोजी मोदी मैदानावर भव्य व ऐतिहासिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमस्थळी दोन्ही दिवस श्री गुरुग्रंथ साहिब विराजमान राहणार आहेत.

या अनुषंगाने २४ जानेवारी रोजी सकाळी तख्त सचखंड श्री हुजूर साहिब गुरुद्वारा ते मोदी मैदान पर्यंत मिरवणूक काढण्यात येणार असून त्यावर हेलिकॉप्टरने पुष्पृष्टी करण्यात येणार आहे. संपूर्ण मिरवणूक मार्ग फुलांनी सजविण्यात येणार आहे.

ही भव्य मिरवणूक भाविकांसाठी श्रद्धा, भक्ती व आध्यात्मिकतेचा अविस्मरणीय अनुभव ठरणार असून, या ऐतिहासिक क्षणाचे साक्षीदार होण्यासाठी भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

## रणबीर कपूर बनला 'पीएनजी ज्वेलर्स' चा ब्रॅण्ड म्बेसेडर

### पीएनजी ला मिळणार आता जगभर ओळख



**लातूर प्रतिनिधी:** १८३२ पासूनचा समृद्ध वारसा जपणारा भारतातील एक अग्रगण्य दागिन्यांचा ब्रँड 'पीएनजी ज्वेलर्स'ने बॉलिवूडचा लोकप्रिय अभिनेता रणबीर कपूर याची नवा ब्रँड ऍम्बेसेडर म्हणून नियुक्ती केली आहे. परंपरेची जाण, आकर्षकता आणि विश्वासार्हता यांचा सहज संगम असलेला रणबीर कपूर 'पीएनजी ज्वेलर्स'च्या प्रवासातील एक रोमांचक नवा अध्याय ठरणार असून, यामुळे ब्रँडची राष्ट्रीय पातळीवरील उपस्थिती अधिक भक्कम करणार आहे.

पीएनजी ज्वेलर्स हा पिढ्यान्पिढ्यांचा वारसा जपणारा आणि विश्वास व मूल्यांवर उभा असलेला ब्रँड आहे, ज्याचा मी मनापासून आदर करतो. परंपरेचा सन्मान करत भविष्याकडे आत्मविश्वासाने वाटचाल करणाऱ्या या ब्रँडचा भाग होणे माझ्यासाठी अतिशय आनंदाचा क्षण आहे आणि या प्रवासाचा मी अभिमानाने भाग बनत आहे.

या भागीदारीबद्दल आपला आनंद व्यक्त करताना 'पीएनजी ज्वेलर्स'चे अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक डॉ. सौरभ गाडगीळ म्हणाले, रणबीर कपूर यांचे व्यक्तिमत्त्व परंपरेचा आदर राखत आधुनिकतेकडे आत्मविश्वासाने वाटचाल करणारे आहे. जसा पीएनजी ज्वेलर्सने आपल्या मुळांशी निष्ठा राखत काळानुसार स्वतःला विकसित केले आहे, तसेच रणबीर कपूरने एका आयकॉनिक वारशाला प्रामाणिकपणे आणि सुसंगततेने पुढे नेले आहे. ही भागीदारी केवळ दृश्यमानतेपुरती मर्यादित नसून, समान मूल्ये आणि भविष्याकडे पाहणाऱ्या सामायिक दृष्टीकोनावर आधारित आहे. या सहकार्याद्वारे पीएनजी ज्वेलर्स आपली ओळख विश्वासाचे प्रतीक, विकसित होत असलेला वारसा आणि कालातीत सौंदर्य म्हणून अधिक मजबूत करत असून, परंपरा आणि आधुनिक भारत यांच्यातील एक सशक्त नाते निर्माण करत आहे.

# नेताजी सुभाषचंद्र भोस : समताधिष्ठित राष्ट्रनिर्मितीचा तेजस्वी माग





भारतीय स्वातंत्र्यलढ्याचा इतिहास हा केवळ राजकीय सत्तांतराचा दस्तऐवज नसून तो भारतीय समाजाच्या आत्मसन्मानाचा, सामाजिक परिवर्तनाचा आणि मानवी प्रतिष्ठेच्या पुनर्स्थापनेचा प्रदीर्घ संघर्ष आहे. या संघर्षात अनेक थोर नेत्यांनी आपले विचार, कृती आणि बलिदान यांच्या माध्यमातून राष्ट्राला नवी दिशा दिली. मात्र या सर्वांमध्ये नेताजी सुभाषचंद्र भोस यांचे व्यक्तिमत्त्व विलक्षण तेजस्वी, धैर्यशील आणि दूरदृष्टीपूर्ण होते. नेताजी हे केवळ सशस्त्र क्रांतीचे नेतृत्व करणारे योद्धा नव्हते, तर ते भारतीय समाजाच्या सामाजिक, आर्थिक आणि नैतिक पुनर्रचनेचे स्वप्न पाहणारे महान समाजचिंतक होते. २३ जानेवारी १८९७ रोजी ओडिशातील कटक येथे जन्मलेले नेताजी संपूर्ण आयुष्य देशाच्या स्वातंत्र्यासाठी आणि समाजाच्या सर्वांगीण उन्नतीसाठी झटले.

नेताजींच्या जीवनकार्याचा विचार करताना हे स्पष्टपणे जाणवते की, त्यांच्या दृष्टीने स्वातंत्र्याचा अर्थ अत्यंत व्यापक होता. परकीय सत्तेपासून मुक्त होणे हे स्वातंत्र्याचे केवळ पहिले पाऊल आहे, असे ते मानत. त्यांच्या मते, खरे स्वातंत्र्य तेव्हाच प्राप्त होईल, जेव्हा भारतीय समाजातील प्रत्येक व्यक्तीला सामाजिक न्याय, आर्थिक संधी, मानवी सन्मान आणि सुरक्षित जीवनाचा अधिकार मिळेल. जात, धर्म, वर्ग, लिंग किंवा भाषेच्या आधारे होणारा भेदभाव संपुष्टात येऊन समतावादी समाजरचना निर्माण होणे, हाच त्यांच्या स्वातंत्र्यसंकल्पनेचा केंद्रबिंदू होता.

नेताजींच्या सामाजिक जाणीवेची मुळे त्यांच्या बालपणातच रुजलेली दिसतात. ब्रिटिश सत्तेच्या अन्यायकारक धोरणांचा, भारतीयांवरील अपमानास्पद वागणुकीचा आणि देशातील दारिद्र्याचा त्यांनी प्रत्यक्ष अनुभव घेतला होता. शिक्षणाच्या काळात स्वामी विवेकानंदांच्या विचारांचा त्यांच्या मनावर खोलवर प्रभाव पडला. आत्मगौरव, आत्मविश्वास, सेवा, त्याग आणि मानवतावाद या मूल्यांनी नेताजींच्या व्यक्तिमत्त्वाची घडण केली. आयसीएससारख्या सर्वोच्च सेवेत यश मिळवूनही त्या पदाचा त्याग करून त्यांनी स्वातंत्र्यलढ्याचा मार्ग स्वीकारला. हा निर्णय केवळ राजकीय नव्हता, तर तो सामाजिक बांधिलकीचा आणि नैतिक धैर्याचा ठोस आविष्कार होता.

भारतीय समाजातील जातीय विषमता आणि अस्पृश्यता ही नेताजींसाठी अत्यंत वेदनादायी बाब होती. जन्माच्या आधारे माणसामाणसांत भेद करणे हे अमानवी असून राष्ट्राच्या एकात्मतेसाठीही घातक आहे, असे त्यांचे ठाम मत होते. जातिव्यवस्थेमुळे समाजाचा मोठा वर्ग शिक्षण, रोजगार, सामाजिक सन्मान आणि मानवी हक्कांपासून वंचित राहिला होता. नेताजींनी या अन्यायाविरुद्ध केवळ शब्दांत नव्हे, तर कृतीतूनही संघर्ष केला. आजाद हिंद सेनेत जात, धर्म किंवा प्रांत यांचा कोणताही भेद न ठेवता सर्वांना समान संधी देण्यात आली. सैनिकांना एकाच पंक्तीत उभे राहून भोजन करणे, समान शिस्त पाळणे आणि एकाच ध्येयासाठी लढणे, ही सामाजिक समतेची जिवंत उदाहरणे होती.

स्त्री-सक्षमीकरण हा नेताजींच्या सामाजिक कार्याचा अत्यंत महत्त्वाचा आणि क्रांतिकारी पैलू होता. त्या काळातील भारतीय समाजात स्त्रियांना प्रामुख्याने दुय्यम आणि मर्यादित भूमिका दिली जात होती. मात्र नेताजींनी स्त्रियांकडे राष्ट्रनिर्मितीतील समान भागीदार म्हणून पाहिले. आजाद हिंद सेनेतील 'राणी झाशी रेजिमेंट' ही भारतीय इतिहासातील स्त्री-मुक्तीची ऐतिहासिक घटना होती. स्त्रियांना शस्त्र हातात घेऊन राष्ट्रासाठी लढण्याची संधी देणे म्हणजे केवळ लष्करी धोरण नव्हते, तर ते सामाजिक क्रांतीचे प्रतीक होते. नेताजींच्या मते, जो समाज आपल्या अर्ध्या लोकसंख्येला दुर्लक्षित ठेवतो, तो समाज कधीही खऱ्या अर्थाने स्वतंत्र आणि प्रगत होऊ शकत नाही.

नेताजींच्या सामाजिक विचारांमध्ये आर्थिक न्यायाला अत्यंत महत्त्वाचे स्थान होते. ब्रिटिश राजवटीत भारतीय अर्थव्यवस्था शोषणावर आधारित होती. शेतकरी, कामगार आणि कष्टकरी वर्ग दारिद्र्य, कर्जबाजारीपणा आणि असुरक्षिततेच्या गर्तेत अडकलेला होता. नेताजी समाजवादी विचारसरणीने प्रभावित होते. त्यांच्या मते, स्वातंत्र्यानंतर भारताने अशी आर्थिक व्यवस्था स्वीकारली पाहिजे, जिथे संपत्ती काही मोजक्या लोकांच्या हातात केंद्रित न राहता समाजाच्या सर्व घटकांच्या कल्याणासाठी वापरली जाईल. राज्याने लोककल्याणकारी भूमिका बजावून आरोग्य, शिक्षण आणि रोजगाराच्या संधी सर्वांपर्यंत पोहोचवाव्यात, अशी त्यांची भूमिका होती.

धर्मनिरपेक्षता आणि राष्ट्रीय एकात्मता हे नेताजींच्या सामाजिक कार्याचे अत्यंत महत्त्वाचे आधारस्तंभ होते. भारत हा विविध धर्म, भाषा आणि संस्कृतींचा देश आहे आणि ही विविधताच भारताची खरी ओळख आहे, असा त्यांचा विश्वास होता. ब्रिटिशांनी 'फोडा आणि राज्य करा' या धोरणातून धार्मिक आणि सामाजिक तेढ निर्माण केली होती. नेताजींनी या धोरणाचा तीव्र विरोध केला. आजाद हिंद सेनेत हिंदू, मुस्लिम, शीख, ख्रिश्चन सर्वजण एकत्र येऊन 'जय हिंद'चा नारा देत लढत होते. हा नारा केवळ युद्धघोष नव्हता, तर सामाजिक एकात्मतेचे आणि राष्ट्रीय ऐक्याचे प्रतीक होता.

शिक्षण हे सामाजिक परिवर्तनाचे सर्वात प्रभावी साधन आहे, असे नेताजी ठामपणे मानत. ब्रिटिश शिक्षणपद्धती ही भारतीयांना मानसिक गुलामगिरीत ठेवणारी आहे, अशी त्यांची टीका होती. शिक्षणातून केवळ नोकरदार तयार न होता स्वाभिमानी, राष्ट्रभक्त आणि सामाजिक जबाबदारीची जाणीव असलेले नागरिक घडले पाहिजेत, असे त्यांचे मत होते. युवकांनी शिक्षणाचा उपयोग केवळ वैयक्तिक प्रगतीसाठी न करता समाजाच्या उन्नतीसाठी करावा, असा त्यांचा आग्रह होता.

नेताजींच्या सामाजिक विचारांमध्ये शिस्त, कर्तव्यभावना आणि नैतिक मूल्यांना अत्यंत महत्त्व होते. त्यांच्या मते, स्वातंत्र्य म्हणजे केवळ अधिकार नव्हे, तर जबाबदाऱ्यांची जाणीवही आहे. आजाद हिंद सेनेतील कठोर शिस्त ही केवळ लष्करी गरज नव्हती, तर भावी भारतीय समाजासाठीचा नैतिक आदर्श होती. भ्रष्टाचार, स्वार्थ आणि नैतिक अधःपतन यांचा त्यांनी तीव्र निषेध केला.

युवाशक्तीवर नेताजींचा अपार विश्वास होता. युवक हे राष्ट्राचे खरे शिल्पकार असून सामाजिक परिवर्तनाची जबाबदारी त्यांच्यावरच आहे, असे ते मानत. भीती, न्यूनगंड आणि निष्क्रियता यांचा त्यांनी तीव्र निषेध केला. ध्येयासाठी सर्वस्व अर्पण करण्याची तयारी, त्यागाची वृत्ती आणि राष्ट्रासाठी बलिदान देण्याची क्षमता हीच युवकांची खरी ओळख असावी, असा त्यांचा संदेश होता.

नेताजी सुभाषचंद्र भोस यांचे सामाजिक कार्य आजच्या काळात अधिकच अर्थपूर्ण वाटते. वाढती आर्थिक विषमता, बेरोजगारी, स्त्री-असमानता, सामाजिक तणाव आणि सांप्रदायिकता यांसारख्या समस्या आजही आपल्या समाजासमोर उभ्या आहेत. अशा परिस्थितीत नेताजींचा समतावादी, शिस्तप्रिय आणि राष्ट्रकेंद्री दृष्टिकोन आपल्याला मार्गदर्शक ठरतो. त्यांच्या विचारांमध्ये केवळ संघर्षाची भाषा नाही, तर समाजबांधणीची स्पष्ट दिशा आहे.

२३ जानेवारी रोजी नेताजी सुभाषचंद्र भोस यांची जयंती साजरी करताना त्यांच्या केवळ शौर्याचे नव्हे, तर त्यांच्या सामाजिक परिवर्तनाच्या स्वप्नाचे स्मरण करणे अत्यंत आवश्यक आहे. सामाजिक न्याय, समता, बंधुता, स्त्री-समानता, आर्थिक समतोल आणि मानवी प्रतिष्ठेवर आधारित भारत निर्माण करणे हेच नेताजींना खरे अभिवादन ठरेल. नेताजी हे इतिहासातील एक महान योद्धा नसून ते आजही भारतीय समाजाच्या आत्म्याला प्रेरणा देणारे जिवंत विचार आहेत.

**डॉ. राजेंद्र बगाटे**
**(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)**

# संत नामदेव



संत नामदेवांचे कुटूंब वारकरी संप्रादयाचे होते. जवळ- जवळ अठरा माणसांचे कुटुंब पांडुरंगाच्या भक्तीत लीन होते. घरच्या या वातावरणाचा प्रभाव संत नामदेवावर झाला. बालपणी झालेले संस्कार आयुष्यभर त्यांच्या सोबत होते. नामदेवांचे वडील दामाशेठी व आई गोणाई हे प्रामाणिक विठ्ठल भक्त होते. संत नामदेवांची भक्ती सर्वश्रुत होती व ते भगवान विठ्ठलाचे सर्वात लाडके होते. एकदा त्यांचे वडील बाहेर काही कामानिमित बाहेर गेले होते तेव्हा देव-ाचा नैवेद्य घेऊन नामा गेले तेव्हा त्यांनी स्वतःच्या हातांनी पांडुरंगाला जेऊ घातले यामुळे ते लोकांत प्रसिद्ध झाले. संत नामदेवांनी आपले सगळे जीवन वारकरी सेवेत घालवले त्यांना कधीही अहंकार आला नाही. ते नेहमी देवाच्या गुण नामातच रमले. संत ज्ञानेश्वर, निवृतीनाथ, सोपानदेव, गोरोबा, मुक्ताई, चोखामेळा हे त्यांचे समकालीन संत होते. त्यांचे अध्यात्मिक गुरु विसोबा खेचर होते. आपल्या वारकरी जीवनात अनेक प्रकारचे अभंग, गौळणी अशा अनेक प्रकारचे लिखाण नामदेवरायांनी केले. संत जनाबाईंना त्यांच्या घरी आश्रय दिला गेला व त्यांना देखील अध्यात्मिक ज्ञान दिले. हे सर्व नामदेवरायामुळे झाल्यामुळेच जनाबाईचा उल्लेख नेहमी, ' दासी जनी नामयाची' असाच होतो. नामदेवरायांचे कीर्तन हे त्यावेळेला चर्चेचा विषय ठरत असे. खुद्ध विठ्ठल भगवान कीर्तनाला हजर राहत असे.

'नामदेव कीर्तन करी पुढे देव नाचे पांडुरंग ।'

आणखी इतकी शक्ती त्यांच्याकडे होती. त्यांचा शुद्ध भाव होता जो देवाला देखील आवडत असे. भागवत धर्माची पताका त्यांनी महाराष्ट्राबाहेर नेली लोकांना भक्तीत आणण्याचा त्यांनी प्रयत्न केला. श्री गोविंद ग्रंथ साहिब या शिख लोकांच्या पवित्र ग्रंथात नामदेवरायांची अभंग व वर्णने केलेली आहेत. पंजाब, राजस्थान, हरियाना या ठिकाणी नामदेवरायांची मंदिरे देखील बांधलेली आहे. त्याकाळी भक्ती बरोबरच देशप्रेमाचे बीज लोकांच्या मनात रुजवण्याचे काम केले.

## प्रोस्टेट आरोग्य निरोगी ठेवण्यासाठी



संतुलित आहार, नियमित व्यायाम आणि नियमित आरोग्य तपासणी आवश्यक आहे. फळे, भाज्या, आणि टोमॅटो (लायकोपीन) सेवन वाढवा, तसेच प्रक्रिया केलेले मांस, दुग्धजन्य पदार्थ आणि चरबीयुक्त पदार्थ टाळा। ५० वर्षांवरील पुरुषांनी वर्षातून **एकदा झड-** चाचणी करून घेणे उत्तम।

प्रोस्टेट आरोग्यासाठी टिप्स:

संतुलित आहार: आहारात फळे, भाज्या (विशेषतः ब्रोकोली, टोमॅटो), आणि संपूर्ण धान्यांचा समावेश करा। **व्यायाम:** वजन नियंत्रणात ठेवण्यासाठी नियमित व्यायाम (उदा. चालणे, धावणे) करा, ज्यामुळे प्रोस्टेट कर्करोगाचा धोका कमी होतो।

काय टाळावे: प्रक्रिया केलेले मांस जास्त चरबीयुक्त दुग्धजन्य पदार्थ आणि लाल मांस टाळा।**पाणी:** भरपूर पाणी प्या आणि मूत्राशय रिकामे ठेवा। **नियमित तपासणी:** वय ४५-५० पेक्षा जास्त असल्यास डॉक्टरांचा सल्ला घेऊन झड- चाचणी आणि डिजिटल रेक्टल परीक्षा (ऊ्ठए) करा। तणाव नियंत्रण: यो-गासने आणि प्राणायाम करा, कारण मानसिक आरोग्यही महत्त्वाचे आहे। **व्यसनमुक्ती:** धूम्रपान आणि मद्यप-ानाचे प्रमाण कमी करा किंवा टाळा। प्रोस्टेटमध्ये वाढ झाल्यास लघवीला त्रास, कमी धार येणे अशी लक्षणे दिसू शकतात, अशा वेळी त्वरित डॉक्टरांचा सल्ला घ्या।

# व्यक्तिमत्त्व विकास

वीशपसध्याच्या काळात 'व्यक्तिमत्त्व विकास' हा शब्द बराच ऐकिवात येतो. व्यक्तिमत्त्व विकासाचा संबंध हा उच्चशिक्षण, खेळात, कलेत प्राविण्य मिळवणे हया गोष्टींशी लावला जातो. मग मनात असा विचार येतो की, व्यक्तिमत्त्व विकासाचे एवढेच पैलू आ-हेत का? व्यक्तिमत्त्व विकासासाठी घेतल्या जाणाऱ्या १५ दिवसांच्या किंवा महिन्यांच्या शिबीरांच्या कालावधीत व्यक्तिमत्त्व विकास होऊ शकतो का? मुलाला समजू लागल्या पासून व्यक्तिमत्त्वाचा विकास होत असतो. आजूबाजूला असलेल्या परिस्थितीचा व घडणा-या घटनांचा मुलांवर परिणाम होत असतो व त्यातून मुलांचे व्यक्तिमत्त्व घडत असते.

आता व्यक्तिमत्त्व घडविणे म्हणजे काय करणे? मुलांची अभ्यासात उत्तम प्रगती असणे, खेळात प्राविण्य असणे, एखादया कलेत प्राविण्य मिळवणे असे आहे का? पण हयातून ज्या मुलांना हया गोष्टी जमतात साहजिकच त्यांना प्रत्येक गोष्टीत यश मिळत गेल्यामुळे आपल्याला यश हे मिळणारच अशी ठाम समजूत होते व त्या मुलांकडून पालकांच्या व समाजाच्या अपेक्षा वाढतात. प्रत्येक वेळी यश मिळेलच अशी भावना वाढीस लागते व त्यातून फाजील आत्मविश्वास वाढत जातो. अशावेळी कधी अपयश आले तर ते अपयश स्वीकारण्याची मनाची तयारी नसते. त्यातून निर्माण होणारे ताणतणाव हे अटळ असतात. हया ताणतणावांना मुलं समर्थपणे तोंड देऊ शकातात का? ह्याचे रूपांतर हट्टीपणात होते. एक ही बाजू, तर दुसरी बाजू हया गोष्टी मुलांना जमल्या नाहीत तर त्या मुलांमध्ये निर्माण होणारा न्यूनगंड- त्यातून मुलांमधे हाणारी तुलना- हया तुलनेतून अपयश मिळाले तर मुलं आपला न्यूनगंड लपवण्यासाठी एक तर आक्रमक बनतात किंवा प्रत्येक गोष्टीत माघार घेऊन ती गोष्ट न करण्याकडे त्यांचा कल होत जातो.



व्यक्तिमत्त्व विकासाच्या दृष्टिकोनातून शारीरिक, मानसिक, बौध्दिक, भावनिक, आरोग्य हयांचे निकोप संवर्धन होणे हे महत्वाचे पैलू मानता येतील. पतंजली मुन-ींनी सांगितलेल्या 'अष्टांग-योगा'ची ढोबळ मानाने दोन विभागात विभागणी होते.

१. बहिरंग योग (यम, नियम, आसन, प्राणायम)

२. अंतरंग योग (प्रत्याहार, धारणा, ध्यान, समाधी)

बहिरंग योगातील प्रथम चार भाग- यम, नियम, आसन, प्राणायम व अंतरंग यो-गातील धारणा ध्यान समाधी व हया दोहोंना जोडणारे 'प्रत्याहार' हे अंग आहे. एकूण व्यक्तिमत्त्व विकास हा योगाभ्यासाने लाभणारा तात्काळ फायदा जरी असला तरी, योगाचा दीर्घ परिणाम हा आपल्या संस्कृतीप्रमाणे तसेच योगसाधनेनुसार, मोक्षाकडेच घेऊन जाणारा असतो.

हया आठ अंगांपैकी पहिली दोन अंगे यम, नियम हयांचा मानसिक व भावनिक संवर्धन करणे व आसन, प्राणायाम यांचा शारीरिक आरोग्य, बौध्दिक संवर्धन करणे हयासाठी उपयोग होऊ शकतो.यम, नियम ह्यामुळे मानसिक व भावनिक संवर्धनाला सुरवात होते. व्यक्तिच्या वर्तणुकीवर त्याचे चांगले परिणाम दिसण्यास सुरवात होते. विस्ताराने यम व नियम यांची माहिती पुढे येईलच, परंतु थोडक्यात सांगायचे झाल्यास, यम व नियम हे मनास वळण लावणारे गुण आहेत. अहिंसा, अपरिग्रह अशा काही न करण्याच्या तसेच ईशस्तवन अशा काही आवर्जून करण्याच्या गोष्टींची एक जंत्री म्हणजे यम व नियम होत. आसन व प्राणायाम यांमुळे प्रामुख्याने शारीरिक व बौध्दिक संवर्धनास ब-याच प्रमाणात मदत होते. यम नियमांच्या पालनाने मानसिक व भावनिक संतुलन साधत असतानाच आसन व प्राणायामामुळे होणारे शारीरिक, बौध्दिक, वैचारिक बदल एकमेकांना पुष्टी देत व्यक्तिमत्त्व विकासातील मोठे कार्य पायाभरणीचे कार्य सुरू करतात. अशा रितीने व्यक्तिमत्त्व वृध्दिंगत होत असतानाच बालकांच्या मनावर होणारे संस्कार सुध्दा विचारात घ्यावे लागतील. काळानुरूप घडणाऱ्या बदलांमुळेच आपोआपच मुलांवर होणारे संस्कार सुध्दा बदलत आहेत. हया संस्कारांची चांगली वाईट पातळी ही देखील व्यक्तिमत्त्व विकासात महत्वाची ठरू शकते. घर, शाळा, समाज हया माध्यमातून होणारे संस्कार व हया ठिकाणी असणारे वातावरण सुध्दा व्यक्तिमत्त्व घडविण्यास कारणीभूत ठरते. यम नियमांचे पालन पालकांपासून समाजापर्यंत जर रूजत गेले तर आपल्या समाजाचे प्रतिबिंब आदर्शवादी ठरू शकते. इतका दुरोगामी परिणाम प्राप्त करणारी ही सर्वंकष अशी अष्टांग-योग पध्दती आहे. आसन व प्राणायाम ही दोन अंगे- सुडौल शारीरिक बांधा, आरोग्य, एकाग्रता, स्थिरता आणि त्यातून मिळणारी संतुलित बौध्दिक व वैचारिक पातळी या सा-या गोष्टी प्रत्यक्षाप्रत्यक्षपणे, व्यक्तिमत्त्व विकासास पूरक ठरतात. हे आसन व प्राणायामाचे फायदे आहेत. आजच्या ऐहिक जीवनात स्पर्धेला तोंड देण्यासाठी आसन प्राणायाम हया दोन गोष्टी अत्यंत महत्वाच्या. त्यांच्या अनुशंगाने सारासार विचार करण्याची प्रवृत्ती वाढीस लागते व चूक-बरोबर, वाईट चांगले हयातील फरक समजून घेण्यास मदत होते. हया जोडीला यम, नियम, यांचेदेखील काटेकोर पालन झाले तर, त्यावेळेस मूल उज्वल यशाकडे मार्गक्रमणा करू लागते. हया गोष्टी लिहिण्यास व बोलण्यास खूप सोप्या वाटत असल्या तरीही आचरणात आणण्यास खूप अवघड आहेत. कारण हयांचा परिणाम दिसून येण्यास खूप जास्त काळ वाट पाहावी लागते, व हे परिणाम प्राप्त होईपर्यंत आणि प्राप्त झालेले परिणाम कायम स्वरूपी टिकून राहण्यासाठी, योगाचा सराव सातत्याने करणे ही अत्यंत आवश्यक बाब आहे.

- सौ. चारूता प्र. फाळके

# तात्यांची भाऊबीज

विजय तरवडे

तात्या पंच्याऐंशीव्या वर्षी गेले. कोणताही मोठा आजार नव्हता. वाढत्या वयानुसार डोळ्यांचा चष्मा जड झाला होता आणि रक्तदाब नावाचा एक जुना दोस्त आयुष्यात येऊन बसला होता-एवढंच.

गेल्या काही महिन्यांत त्यांची भूक हळूहळू कमी होत गेली. सकाळी उठल्यावर एक कप चहा घेत. दिवसभरात तीन-चार कप चहा पिण्याची सवय कधीच मागे पडली होती. जणू जगण्याचीच आस त्यांच्यातून निसटून गेली होती.

बहुधा तात्यांना जगण्यात वैराग्य वाटू लागलं होतं. पंधरा वर्षांपूर्वी बायको गेली होती. मूलबाळ नव्हती. एकुलती एक बहीण-सुमाताई-लग्न होऊन परगावी स्थायिक झाली होती. कित्येक वर्षांत ती भावाकडे फिरकली नव्हती. कोणासाठी जगायचं? हा प्रश्न तात्यांच्या मनात घर करून बसला असावा.

गेल्या पंचवीस वर्षांपासून सखुबाई त्यांच्या घरी धुणी-भांडी, झाडलोट करायला येत होती. तात्यांची बायको गेल्यानंतर तिने स्वयंपाकाची जबाबदारीही घेतली. स्वयंपाक म्हणजे फारसं काही नसे. सकाळी थोडे पोहे, उपमा किंवा शिरा. दुपारसाठी चार पोळ्या आणि भाजी. कधीमधी बदल म्हणून आमटी-भात किंवा मसालेभात. दुपारी चुकून भूक लागलीच तर खारे दाणे, पातळ पोह्यांचा फिका चिवडा असे काहीतरी घरात तयार असायचं.

तात्या आता घराबाहेर पडत नसत. वाड्यातल्या तळमजल्यावरच्या दोन छोट्या खोल्यांत त्यांचं आयुष्य सामावलं होतं.

वाड्यासमोर वाहता रस्ता असल्यामुळे बाहेर जाण्याची त्यांना भीती वाटे. म्हणून सकाळ-संध्याकाळ ते वाड्यातल्या अंगणातच शतपावली करीत. कधी पहाटे बाहेर पडलेच तर रस्त्याच्या कडेकडेने काही पावलं चालून लगेच परत येत.

पेपरवाला दररोज पेपर टाकून जायचा. बातम्यांमध्ये तात्यांना काहीच रस उरला नव्हता. शब्दकोडी भरपूर असलेला पेपर ते खास घेत. त्यातली कोडी सोडवत वेळ कसा जातो, ते त्यांनाच कळायचं नाही.

महिन्यातून एकदा सखुबाई तात्यांना रिक्षाने बँकेत घेऊन जाई. तात्या पेन्शनची विड्रॉवल स्लिप भरत.



पैसे काढल्यानंतर परत येताना वाटेत बाबुलालच्या दुकानातून अर्धा पाव जिलबी, लस्सी किंवा एखादं गोडधोड घेत. त्या दिवशी सखुबाईला तिचा पगार मिळे. त्या दिवशी ती तात्यांसोबत जेवायची. पेन्शनमधून महिन्याभराचं सामान आणून, वीजबिल, केबलचे पैसे, पेपरचे बिल भरून, घरभाड्याच्या पावत्या फायलीत लावून ठेवायची. तात्या आजारी पडले, तर त्यांना दवाखान्यात नेणं-आणणं सगळं सखुबाईच करायची.

तात्या गेले आणि हा सगळा दिनक्रम थांबला.त्या दिवशी सखुबाई नेहमीप्रमाणे आली. वाड्यातली इतर कामं उरकून ती तात्यांच्या घरी गेली. तात्या कधीच खोलीचं दार आतून लावून घेत नसत. घरात चोरण्यासारखं काहीच नव्हतं. एखादी आपत्कालीन परिस्थिती आली तर कुणीही मदतीला यावं-हाच त्यांचा हेतू. त्या दिवशी मात्र तात्या उठले नव्हते. तिला आश्चर्य वाटलं. हाका मारल्या. पण आतून काहीच प्रतिसाद नव्हता. शंका आली. तिने वाड्यातल्या लोकांना बोलावलं. कुणीतरी ऑक्सिमीटर आणलं. तात्यांची बोटं त्यात घातली. काहीच हालचाल नव्हती.

तात्या गेले होते. दुपारी त्यांचे नेहमीचे डॉक्टर आले. तपासून त्यांनी रीतसर मृत्यूचे प्रमाणपत्र दिलं.तात्यांना जवळचा कुणी नातलग नव्हता. बहिणीचा पत्ताही कुणाला ठाऊक नव्हता. वाड्यातल्या लोकांनीच त्यांचे अंत्यसंस्कार पार पाडले.

महिनाभराने कुठून तरी सुमाताईला तात्यांच्या निधनाची बातमी कळली. ती आली. घरमालकांना भेटली. डोळे पुसले. मग तात्यांच्या खोल्यांबद्दल चौकशी केली.

तात्यांनी रीतसर मृत्युपत्र करून ठेवलं होतं. त्यांच्या दोन्ही खोल्यांचा ताबा आणि बँकेतली शिल्लक- आपल्या मानलेल्या बहिणीला, सखुबाईला द्यावी, अशी त्यांची अखेरची इच्छा होती. मी त्यांची सख्खी बहीण आहे, सुमाताई म्हणाली, त्यांची अखेरची इच्छा होती, त्याप्रमाणेच सगळं झालं, असं उत्तर तिला मिळालं. तात्यांनी असं का केलं? सखुबाई त्यांचा मोठा आधार होती-हे खरं. पण त्यामागे एक जुनी जखमही होती.

सुमाताईचं लग्न झालं, त्या पहिल्या वर्षी भाऊबीजेच्या काही दिवस आधी तात्यांनी तिला अकरा रुपयांची ओवाळणी मनीऑर्डरने पाठवली होती. त्यावर ताईनं उत्तर पाठवलं होतं, तात्या, पुन्हा अशी मनीऑर्डर पाठवू नकोस. अकरा रुपयांसारख्या तुटपुंज्या रकमेने सोसायटीत मला फार अवघड वाटतं. आणि मोठी रक्कम पाठवण्याची तुझी ऐपतही नाही. त्या दिवसापासून मरेपर्यंत तात्यांनी सखुबाईकडूनच राखी बांधून घेतली. भाऊबीजेला तीच त्यांचं औक्षण करायची, आणि तात्या तिला नेहमी तुटपुंजी ओवाळणी द्यायचे.

पण मरणोत्तर तात्यांनी सखुबाईला घसघशीत ओव-ाळणी दिली होती.

## १ Doctor Tips — सल्ला डॉक्टरचा

### डार्क चॉकलेट

डार्क चॉकलेट निश्चित रूपानं तुमच्या त्वचेकरता लाभदायक आहे. कॉकोया फ्लावानोल सारख्या अँटीऑक्सीडेंट ने भरलेले असल्याने डार्क चॉकलेट तुमच्या त्वचेला हाइड्रेट ठेवते शिवाय साफ आणि स्वस्थ ठेवण्यात साहाय्यक आहे. कॉकोया तुमच्या त्वचेला मुलायम बनवतं आणि सोबतच चेहे-यावर सुरकुत्या सुध्दा लवकर येउ देत नाही परंतु तुम्ही याचे सेवन जास्त प्रमाणात करू नका रोज एका सिमीत मात्रेत याचे सेवन करणे निश्चितच तुमच्याकरता फायदयाचे राहील. **(क्रमश. )**



## २ Joke — विनोद




सौरव - माझी गाय सुका चारा खात नाही. फक्त हिरवा चारा खाते. पण हिरवा चारा आज मिळत नाही, मी काय करू?

सचिन - गाईच्या डोळ्याला हिरव्या रंगाचा चष्मा लावून टाक म्हणजे गाईला सुका चारा हिरवा दिसेल व ती खाईल.

## ३ Message — संदेश




Santa Banta eating Fish

Santa: oye banta machli khayega?
Banta: nhi yaar usme kaante hote hain.
Santa: oye chadd yaar, chappal pahen ke kha lena.

## ४ Thought — सुविचार

शिक्षणाची मुळे कडू असली तरी त्याची फळे मधूर असतात. - ॲरिस्टॉटल



### संस्कृत सुभाषित

यः शास्त्रविधिमुत्सृज्य वर्तते कामकारतः।
न स सिद्धिमवाप्नोति न सुखं न परांगतिम्।।

जो शास्त्राचे नियम झुगारून देऊन विषयोपभोगांच्या इच्छेप्रमाणे वर्तन करतो, तो सदैव अपयशी होतो, दुःखी होतो व त्याला श्रेष्ठ गती प्राप्त होत नाही.

# महाशब्दकोड्यांचा समाचार



**आडवे शब्द**

१. खुशालचंद, भटक्या
४. संतोषजनक
९. कोर्टातील खटला
११. माया, प्रेम
१२. रानरेडा
१३. रायगडाचा प्रसिद्ध कडा
१५. तर्क, अंदाज
१६. प्रजा, रयत
१७. हस्त पण नक्षत्र नव्हे
१८. सत्त्व
१९. श्वसनाचा अवयव
२०. चेहरा, मुख
२१. पोळ्या करण्याचे जोडसाधन
२३. न दबणारे, टणक
२४. वाकलेला
२५. चिखल
२६. बेचव, कंटाळवाणे
२७. जकात, वसूल करणारा अधिकारी
२९. बोचकारा
३१. दात
३२. असह्य वेदना
३५. चांदी
३६. हिरवा (हिंदी)
३९. कठोर, कडक
४१. तत्काळ योग्य उत्तर देणारा
४४. प्रमाणापेक्षा जास्त
४६. मूळ आधार
४७. ढग
४९. जाती, कुळ
५०. कलावंत
५३. प्रार्थना, उपासना
५४. शांत करणे
५६. भजनात येणारा भला-चांगला
५७. पुष्परस
५८. एकदम थांबणे
६१. नाराजीतून आलेली खंत
६२. आवडता, प्रिय
६५. रमापती
६८. शूर पुरुष
७०. देव, परमेश्वर
७१. अस्वल
७३. गणपती
७५. बैलाचा सण
७६. निर्बुद्ध
७७. झकास
७८. गोष्टीतला दुष्ट

**उभे शब्द**

२. हातोहात, त्वरेने
३. गाडीचे छत
४. समानता
५. आई
६. शहरप्रमुख, कोतवाल
७. लबाडीचा हेतू
८. वटवट, बडबड
९. किंमत
१०. वेडावाकडा
११. चिंतन
१४. जोराने आवळून बांधणे
१५. दुर्लक्ष करणे
१६. आईवडील
१७. वेदना
२०. विहीर
२१. नाणी पारखणारा
२२. लत्ताप्रहार
२३. व्यायाम
२४. नम्रतेने मान झुकवलेला
२५. पक्ष्याचा उडण्याचा अवयव
२८. तोफगाडी
३०. मोजकेपणा, मितता
३३. मरेपर्यंत
३४. निराश
३७. एक गड्डा पानभाजी
३८. चंद्र
४०. मुस्लिमांचा उपवासाचा महिना
४२. समुद्र
४३. छोटा, लहान
४४. गुन्हा
४५. शूर
४६. बाळभाषेत पाणी
४८. दहाचा समुदाय
५१. भांडणे लावणे
५२. नेहमी रडणारा
५३. आंब्याचे बन
५५. सापाची एक जात
५६. शरीर (हिंदी)
५९. अजा, शेळी
६०. शेतातील उपकरणे
६३. भित्रा
६४. मऊ
६६. तपास, शोध
६७. क्रिकेटमधील धाव
६९. जीभ
७२. तालासुरांची गट्टी जमते ती जागा
७४. प्राण्यांचे नैसर्गिक अस्त्र

**आडवे उत्तर**

१.उडाणटप्पू ४.समाधानकारक ९.दावा
११.ममता १२.गवा १३.टकमक
१५.आडाखा १६.जनता १७.कर
१८.कस १९.नाक २०.आनन
२१.पोळपाट लाटणे २३.कडक २४.नत
२५.पंक २६.नीरस २७.जकातदार
२९.ओरखडा ३१.रदन ३२.मरणयातना
३५.रजत ३६.हरा ३९.करडा
४१.हजरजबाबी ४४.अवाजवी ४६.पाया
४७.नीरद ४९.जातपात ५०.कलाकार
५३.आराधना ५४.शमन ५६.बरवा
५७.मध ५८.थबकणे ६१.खेद
६२.लाडका ६५.रमावर ६८.नरवीर
७०.ईश्वर ७१.रीस ७३.गजानन ७५.पोळा
७६.मठ्ठ ७७.मस्त ७८.खलनायक

**उभे उत्तर**

२.डाकोडाक ३.टप ४.समता ५.माता
६.नगरपाल ७.कावा ८.कटकट ९.दाम
१०.वाकडातिकडा ११.मनन १४.कसणे
१५.आनाकानी करणे १६.जनकजननी
१७.कळ २०.आड २१.पोतदार
२२.लाथ २३.कसरत २४.नतमस्तक
२५.पंख २८.रणगाडा ३०.रजपज
३३.तहहयात ३४.नाराज ३७.कोबी
३८.रजनीनाथ ४०.रमजान ४२.रत्नाकर
४३.बारका ४४.अपराध ४५.वीर
४६.पापा ४८.दशक ५१.लावाल-ावी ५२.रडका ५३.आमराई ५५.मणेर
५६.बदन ५९.बकरी ६०.अवजार
६३.डरपोक ६४.नरम ६६.माग
६७.रन ६९.रसना ७२.सम
७४.नख



# क्रीडा विश्व



## थोडक्यात/ संक्षिप्त

### टी २० वर्ल्ड कपच्या फायनलमध्ये कोणते दोन संघ पोहोचणार?

**नवी दिल्ली–**आयसीसी टी २० वर्ल्ड कपची सुरुवात ७ फ ब्रुवारीपासून होणार आहे. भारत आणि श्रीलंका यांच्याकडून टी २० वर्ल्ड कपचं आयोजन केलं जात आहे. ऑस्ट्रेलियाचा माजी कॅप्टन मायकल क्लार्कनं मोठं वक्तव्य केलं आहे. आयसीसी टी २० वर्ल्ड कपच्या फायनलमध्ये कोण खेळणार? आणि भारत आणि पाकिस्तान यांच्यातील मॅचमध्ये काय घडणार याबाबत देखील मायकल क्लार्कनं भविष्यवाणी केली आहे. भारताचा पहिला सामना ७ फेब्रुवारीला होणार आहे. तर, भारत आणि पाकिस्तान मॅच १५ फेब्रुवारीला होणार आहे. मायकल क्लार्क यानं अंतिम सामन्यात भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यात लढत होईल, असं म्हटलं. भारत आणि ऑस्ट्रेलिया वनडे वर्ल्ड कपच्या फायनलमध्ये आमने सामने आले होते.

### ३९ वर्षीय गोलंदाजाने मैदान गाजवले; ५०० विकेट्स घेत घडवला इतिहास

दिल्ली–रणजी ट्रॉफी स्पर्धेला पुन्हा एकदा सुरूवात झाली आहे. या स्पर्धेत पुन्हा एकदा युवा खेळाडूंचा बोलबाला पाहायला मिळणार आहे. या स्पर्धेत महाराष्ट्र आणि गोवा यांच्यात सुरू असलेल्या सामन्यातील पहिल्याच दिवशी महाराष्ट्राचा फिरकीपटू जलज सक्सेनाच्या फिरकी गोलंदाजीचा बोलबाला पाहायला मिळाला आहे. पहिल्या दिवशी फलंदाजी करताना गोवा संघाचा पहिला डाव अवघ्या २०९ धावांवर आटोपला. या डावात जलज सक्सेनाने ७९ धावा खर्च करून ६ गडी बाद केले. यासह श्रेणी क्रिकेटमध्ये ५०० गडी बाद करण्याचा पल्ला गाठला.

### बहिष्कार टाकल्याने बांगलादेशला किती आर्थिक नुकसान होणार?

दिल्ली–आयसीसी टी२० वर्ल्ड कप २०२६ ही स्पर्धा ७ फ ब्रुवारी ते ८ मार्च दरम्यान भारत आणि श्रीलंका शहरांमध्ये खेळवली जाणार आहे. मात्र या स्पर्धेसाठी भारत दौरा करण्यात बांगलादेशचा संघ नकार देत आहे. आयसीसीने बांगलादेशला अंतिम निर्णय घेण्यासंदर्भात बुधवारी एका दिवसाचं अल्टिमेटम दिलं होतं. मात्र तरीही बांगलादेश सरकार हे त्यांचा संघ टी२० वर्ल्ड कप खेळवण्यासाठी भारतात न पाठवण्यासंदर्भात ठाम आहे. श्रीलंकेत सामने खेळण्यास आम्ही तयार आहोत पण भारत दौरा करणार नाही अशी भूमिका बांगलादेशने घेतलीये.

### टी२० वर्ल्ड कपसाठी संघात दोन मोठे बदल, 'या' खेळाडूंची एंट्री

दिल्ली–आयसीसी टी २० वर्ल्ड कप २०२६ ला आता अवघे काही दिवस शिल्लक आहेत. त्यापूर्वी दक्षिण आफ्रिकेच्या संघाला मोठा धक्का बसला आहे. संघाचा स्टार फलंदाज टोनी डी जोरजी आणि ऑलराऊंडर डोनोवन फरेरा याना दुखापतीच्या कारणामुळे वर्ल्ड कप संघातून बाहेर जावं लागलं आहे. हे दोघे आता वेस्ट इंडिज विरुद्ध तीन सामन्यांची टी२० सीरिज सुद्धा खेळणार नाहीत. भारताविरुद्धच्या नुकत्याच झालेल्या वनडे सीरिज दरम्यान टोनी डी झोर्झीच्या उजव्या पायाच्या स्नायूला दुखापत झाली होती. त्यानंतर आता दक्षिण आफ्रिकेच्या क्रिकेट बोर्डाने सांगितले की, डी जोरजीची प्रकृती ही अपेक्षेनुसार नाही आणि तो आगामी टी २० सीरिजसाठी सुद्धा तंदुरुस्त राहणार नाही

### कर्णधार सूर्यकुमार यादव गाठणार शतकी टप्पा

नागपूर : भारत आणि न्यूझीलंड यांच्यातील पाच सामन्यांच्या टी–२० मालिकेचा थरार बुधवारपासून नागपूरच्या विदर्भ क्रिकेट असोसिएशन मैदानावर सुरू होत आहे. हा सामना भारतीय क्रिकेटसाठी आणि विशेषतः कर्णधार सूर्यकुमार यादव याच्यासाठी ऐतिहासिक ठरणार आहे. या सामन्यात मैदानावर उतरताच सूर्या आपल्या आंतरराष्ट्रीय टी–२० कारकिर्दीतील १०० वा सामना खेळणार आहे. आंतरराष्ट्रीय टी–२० क्रिकेटमध्ये १०० सामन्यांचा टप्पा ओलांडणारा सूर्यकुमार हा केवळ चौथा भारतीय खेळाडू ठरेल. आतापर्यंत भारतासाठी सर्वाधिक टी–२० सामने खेळण्याचा मान रोहित शर्मा (१५९ सामने), विराट कोहली (१२५ सामने) आणि हार्दिक पांड्या (१२४ सामने) यांच्याकडे आहे. आजच्या सामन्यात हार्दिक पांड्यादेखील विराट कोहलीच्या विक्रमाशी बरोबरी करण्याची शक्यता आहे.

# टी–२० विश्वचषक खेळण्यास बांगलादेशने दिला नकारच!

**वृत्तसंस्था, ढाका:** बांगलादेश क्रिकेट मंडळाने (बीसीबी) आपली भूमिका बदलण्यास ठाम नकार दिला असून आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेच्या (आयसीसी) ताकदीनंतरही त्यांनी आगामी ट्वेन्टी–२० विश्वचषक स्पर्धेसाठी संघ भारतात पाठविणार नसल्याचे स्पष्ट केले आहे. त्यामुळे बांगलादेश संघाचा स्पर्धेतील सहभागच धोक्यात आला आहे.

७ फेब्रुवारीपासून सुरू होणाऱ्या ट्वेन्टी–२० विश्वचषकात बांगलादेश संघाचे चारही साखळी सामने भारतात नियोजित आहेत. मात्र, सुरक्षेविषयी चिंता व्यक्त करताना 'बीसीबी'ने आपला संघ भारतात पाठविण्यास नकार देताना सामने श्रीलंकेत हलविण्याची मागणी केली होती. 'आयसीसी'च्या मंडळाने ती फेटाळून लावली.

स्कॉटलंडला संधी? बांगलादेशने भारतात खेळण्यास नकार दिल्यास त्यांना थेट स्पर्धेबाहेर करून त्यांच्या जागी स्कॉटलंडचा समावेश करण्याचा निर्णय 'आयसीसी'च्या मंडळाच्या बैठकीत घेण्यात आला होता.



**बांगलादेश क्रिकेट मंडळाने (बीसीबी) आपली भूमिका बदलण्यास ठाम नकार दिला असून आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेच्या (आयसीसी) ताकदीनंतरही त्यांनी आगामी ट्वेन्टी–२० विश्वचषक स्पर्धेसाठी संघ भारतात पाठविणार नसल्याचे स्पष्ट केले आहे.**

# विजयी सातत्याचे ध्येय!

## दुसऱ्या सामन्यात आज सॅमसन, किशनकडून सुधारणा अपेक्षित

**रायपूर–**पहिल्या ट्वेन्टी–२० क्रिकेट सामन्यातील चमकदार कामगिरीनंतर भारतीय संघाचे विजयी सातत्याचे ध्येय असून आज, शुक्रवारी रायपूर येथे होणाऱ्या दुसऱ्या सामन्यात संजू सॅमसन आणि इशान किशन हे आघाडीच्या फळीतील फलंदाज कामगिरी उंचावतील अशीही त्यांना अपेक्षा असेल.

भारतीय संघाने बुधवारी नागपूर येथे झालेल्या पहिल्या ट्वेन्टी–२० सामन्यात पाहुण्या न्यूझीलंडवर ४८ धावांनी मात केली. यासह भारताने पाच सामन्यांच्या मालिकेत १–० अशी आघाडीही मिळवली आहे. मात्र, या मालिकेकडे आगामी ट्वेन्टी–२० विश्वचषक स्पर्धेची रंगीत तालीम म्हणून पाहिले जात असल्याने, मालिकेच्या निकालापेक्षा खेळाडूंच्या कामगिरीला अधिक महत्त्व प्राप्त झाले आहे. पहिल्या सामन्यात डावखुरा सलामीवीर अभिषेक शर्माने (३५ चेंडूंत ८४) तडाखेबंद फलंदाजी केली. तसेच रिंकू सिंहने विजयवीराच्या भूमिकेत आपली उपयुक्तता सिद्ध केली, तर कर्णधार सूर्यकुमार यादव आणि हार्दिक पंड्या यांनीही फलंदाजीत योगदान दिले. सॅमसन आणि किशन यांना मात्र अपयश आले. ट्वेन्टी–२० विश्वचषकासाठी अभिषेकसह सॅमसनला सलामीसाठी पसंती देण्यात आली आहे. सॅमसनने याआधी सलामीला चांगली कामगिरी करून दाखवली आहे, परंतु न्यूझीलंडविरुद्ध पहिल्या सामन्यात तो अतिशय साधारण चेंडूवर बाद झाला. त्यामुळे दुसऱ्या सामन्यात अधिक लक्षपूर्वक फलंदाजी करण्याचा त्याचा मानस असेल. दुसरीकडे, तिलक वर्माच्या अनुपस्थितीत किशनला तिसऱ्या क्रमांकावर खेळण्याची



**भारतीय संघाने बुधवारी नागपूर येथे झालेल्या पहिल्या ट्वेन्टी–२० सामन्यात पाहुण्या न्यूझीलंडवर ४८ धावांनी मात केली. यासह भारताने पाच सामन्यांच्या मालिकेत १–० अशी आघाडीही मिळवली आहे.**

संधी मिळाली, पण त्याला केवळ आठ धावाच करता आल्या. दोन वर्षांनंतर भारतीय संघात पुनरागमन करणाऱ्या किशनने डावाच्या पहिल्याच चेंडूवर समोरील दिशेला अप्रतिम चौकार लगावला. मात्र, फटकेबाजीच्या नादातच तो बादही झाला. त्यामुळे आता अधिक जबाबदारीने खेळण्याचा त्याचा प्रयत्न असेल. तिलक केवळ पहिल्या तीन सामन्यांसाठी उपलब्ध नाही. त्यामुळे त्याच्या पुनरागमनाआधी किशनला स्वत:ची गुणवत्ता पुन्हा सिद्ध करावी लागेल.

न्यूझीलंड संघाला पहिल्या ट्वेन्टी–२० सामन्यात चांगला खेळ करता आला नाही. ग्लेन फिलिप्सची (४० चेंडूंत ७८) फलंदाजी वगळता त्यांच्यासाठी फारशा सकारात्मक गोष्टी घडल्या नाहीत. त्यामुळे फलंदाजी आणि गोलंदाजीत अधिक दर्जेदार खेळ करण्याचा त्यांचा प्रयत्न असेल. रायपूर येथील खेळपट्टीकडून वेगवान गोलंदाजांना मदत मिळण्याची शक्यता आहे. अशात लेग–स्पिनर ईश सोधीच्या जागी झॅक फॉल्क्सला खेळिवण्याचा न्यूझीलंड विचार करू शकेल. वेळ : सायं. ७ वा. थेट प्रक्षेपण : स्टार स्पोर्टस १, १ हिंदी, जिओहॉटस्टार ॲप.

दवाचा परिणाम?

रायपूर येथील शहीद वीर नारायण सिंह स्टेडियमवर गेल्याच महिन्यात भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यात एकदिवसीय सामना झाला. त्यात प्रथम फलंदाजी करताना ३५८ धावांचा डोंगर उभारूनही भारताला पराभव पत्करावा लागला होता. त्या वेळी दवाचा मोठा परिणाम दिसून आला होता. दवामुळे मैदान ओले झाल्याने गोलंदाजांना चेंडूवर नियंत्रण राखणे अवघड गेले होते. आता हेच आजच्या ट्वेन्टी–२० सामन्यात दिसू शकेल. त्यामुळे नाणेफेक जिंकणारा संघ आव्हानाचा पाठलाग करणेच पसंत करेल असे अपेक्षित आहे.

संघ भारत : सूर्यकुमार यादव (कर्णधार), संजू सॅमसन (यष्टिरक्षक), अभिषेक शर्मा, इशान किशन, हार्दिक पंड्या, शिवम दुबे, रिंकू सिंह, अक्षर पटेल, वरुण चक्रवर्ती, जसप्रीत बुमरा, अर्शदीप सिंग, कुलदीप यादव, रवी बिश्नोई, हर्षित राणा, श्रेयस अय्यर. न्यूझीलंड : मिचेल सँटनर (कर्णधार), डेव्हॉन कॉन्वे (यष्टिरक्षक), टीम रॉबिन्सन, रचिन रवींद्र, ग्लेन फिलिप्स, मार्क चॅपमन, डॅरेल मिचेल, काएल जेमिसन, जेकब डफफी, क्रिस्टियन क्लार्क, ईश सोधी, बेवन जेकब्स, जिमी नीशम, झॅक फॉल्क्स, मायकल ब्रेसवेल, मॅट हेन्री.

# माजी फुटबॉलपटू इलियास पाशा यांचे निधन

**नवी दिल्ली/कोलकाता–** भारत आणि ईस्ट बंगालचे माजी फुटबॉलपटू इलियास पाशा यांचे दीर्घ आजाराने गुरुवारी निधन झाले. ते ६१ वर्षांचे होते. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुली आणि दोन मुले असा परिवार आहे. कर्नाटकातून पुढे आलेल्या सर्वोत्तम फुटबॉलपटूंमध्ये पाशा यांचे नाव घेतले जाते. शांत स्वभाव, शिस्तबद्ध खेळ आणि बचावाचे अचूक तंत्र यासाठी ओळखले जाणारे पाशा प्रामुख्याने उजव्या बाजूचे 'विंग–बॅक' म्हणून खेळायचे. त्यांनी जानेवारी १९८७ मध्ये नेहरू चषक स्पर्धेत बल्गेरियाविरुद्ध भारताकडून पदार्पण केले. त्यांनी एकूण आठ आंतरराष्ट्रीय सामने खेळताना १९८७ व १९९१ नेहरू चषक, १९९१ सॅफ गेम्स आणि १९९२ आशिया चषक पात्रता स्पर्धेत भारताचे प्रतिनिधित्व केले.क्लब पातळीवर त्यांनी ईस्ट बंगालसाठी उल्लेखनीय कामगिरी



केली. १९९०च्या दशकात ईस्ट बंगालच्या सुवर्णकाळात त्यांचे योगदान महत्त्वाचे ठरले. १९९३–९४ हंगामात ते संघाचे कर्णधारही होते. त्यांच्या नेतृत्वाखाली ईस्ट बंगालने अनेक स्पर्धा जिंकल्या.

अखिल भारतीय फुटबॉल महासंघाने (एआयएफएफ) पाशा यांच्या निधनाबद्दल शोक व्यक्त केला असून, कोलकात्यात ईस्ट बंगालचा झेंडा अर्ध्यावर फडकावण्यात आला. भारतीय फुटबॉलने एक संयमी आणि विश्वासार्ह रक्षक गमावला, अशी भावना व्यक्त करण्यात आली.



# टी–२० विश्वचषक २०२६ मधील लक्षवेधी खेळाडू कोण असणार?

दिल्ली–टी–२० विश्वचषक २०२६ अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपला आहे. भारत आणि न्यूझीलंड यांच्यात टी–२० विश्वचषकापूर्वीची रंगीत तालीम म्हणून टी–२० मालिका खेळवली जात आहे. या मालिकेतील पहिल्या सामन्यात भारताने दणदणीत विजय मिळवला आहे. यादरम्यान एका कार्यक्रमात भारताचे माजी खेळाडू व कोच रवी शास्त्री व इंग्लंडचा माजी खेळाडू केविन पीटरसन यांनी भारताच्या खेळाडूचं वर्ल्डकपमील लक्षवेधी खेळाडू म्हणून नाव घेतलं आहे. टी–२० विश्वचषक २०२६ १५ दिवसांवर आलेला असताना बांगलादेश क्रिकेट संघाने टी–२० वर्ल्डकपमधून माघार घेतली आहे. भारतात संघाला स्पर्धेतील वर्ल्डकप सामने खेळायचे नसल्याने संघाने स्पर्धेतून माघार घेण्याचा निर्णय घेतला आहे. बांगलादेश व भारतात गेल्या काही दिवसांपासून तणावाची स्थिती होती. यानंतर बीसीसीआयने बांगलादेशचा खेळाडू मुस्ताफिजूर रहमान याला आयपीएलचा संघ केकेआरमधून रिलीज करण्यास सांगितलं, यानंतर बांगलादेशने भारतात टी–२० सामने खेळणार नसल्याने इतर ठिकाणी सामने व्हावेत, अशी विनंती केली. तर आयसीसीने नकार दिल्यानंतर अंतिम निर्णय देण्यासाठी अल्टीमेटम दिला होता. यानंतर आता बांगलादेशने वर्ल्डकपमधून माघार घेतली आहे. मॅरियट बोनव्हाय व इंटरनॅशनल क्रिकेट काऊन्सिल (आयसीसी) यांच्यामध्ये ग्लोबल पार्टनरशिप झाली



आहे. यासंबंधित कार्यक्रमाला रवी शास्त्री व केविन पीटरसन हे एकत्र उपस्थित होते. यादरम्यान त्या दोघांनाही विचारण्यात आलं की यंदाच्या टी–२० विश्वचषकातील लक्षवेधी खेळाडू कोण असेल, यावर केविन पीटरसनने सर्वात आधी दक्षिण आफ्रिकेचा फलंदाज डेवाल्ड ब्रेविस याचं नाव घेतलं आणि यानंतर त्याने भारताचा फलंदाज अभिषेक शर्माचं नाव घेतलं. तर रवी शास्त्री यांनीदेखील थेट अभिषेक शर्माचं नाव घेतलं. रवी शास्त्री अभिषेक शर्माबद्दल बोलताना म्हणाले, या वर्ल्डकपमधील लक्षवेधी खेळाडू हा अभिषेक शर्मा असेल. जगातील पहिल्या क्रमांकाचा टी–२० फलंदाज आहे. तो चांगल्या फॉर्मात आहे. गेल्या सामन्यात त्याने त्याच्या उत्कृष्ट खेळीच्या बळावर न्यूझीलंडला सामन्यातून बाहेर केलं. तो लक्षवेधील खेळाडू असेल, कारण त्याचा कॉन्फिडन्स कमाल आहे. जर तो कमालीची इनिंग खेळला तर संघ मोठी धावसंख्या उभारणार हे निश्चित असतं.अभिषेक शर्माने न्यूझीलंडविरूद्ध पहिल्या टी–२० सामन्यात उत्कृष्ट खेळी करत संघाच्या मोठ्या धावसंख्येचा पाया रचला. अभिषेक शर्माने ३५ चेंडूत ५ चौकार व ८ षटकारांसह ८३ धावांची खेळी केली. मोठा फटका खेळण्याच्या प्रयत्नात अभिषेक शर्मा झेलबाद झाल्याने त्याचं शतक हुकलं. अभिषेक शर्मा यादरम्यान २५ किंवा त्यापेक्षा कमी चेंडूंत सर्वाधिक वेळेस अर्धशतक झळकावणारा जगातील पहिला खेळाडू ठरला. त्याने षटकारांमध्ये युवराज सिंगला मागे टाकलं आहे.

# इलियास पाशा: कर्नाटकचा सज्जन फुटबॉलपटू जो पूर्व बंगालचा दिग्गज बनला

अखिल भारतीय फुटबॉल महासंघाने भारताचे माजी बचावपटू इलियास पाशा यांच्या निधनाबद्दल शोक व्यक्त केला आहे. इलियास पाशा यांचे गुरुवारी, २२ जानेवारी २०२६ रोजी दीर्घ आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुली आणि दोन मुले असा परिवार आहे.

एक वचनबद्ध आणि मृदुभाषी फुटबॉलपटू, इलियास पाशाने अशा क्षेत्रात एक प्रतिष्ठित कारकीर्द घडवली जिथे लवचिकता आणि संयम आवश्यक होता – बचाव. प्रामुख्याने उजव्या विंग–बॅक म्हणून काम करणारा, तो त्याच्या अचूक वेळेची जाणीव, शांत वर्तन आणि खेळाचे बारकाईने वाचन करण्याची क्षमता यासाठी प्रसिद्ध होता. दबावाखाली क्वचितच अस्वस्थ होणारा, पाशाच्या शिस्तबद्ध पोझिशनिंग आणि योग्यरित्या निवडलेल्या टॅकलमुळे विरोधी डाव्या विंगर्सना त्याच्या बाजूने फारसा आनंद मिळाला नाही, तर त्याच्या मागे गोलकीपर अधिक आत्मविश्वासाने खेळत होते.

आंतरराष्ट्रीय स्तरावर, इलियास पाशाने २७ जानेवारी १९८७ रोजी कोझिकोड येथे झालेल्या नेहरू कपमध्ये बल्गेरियाविरुद्ध भारताकडून पदार्पण केले. त्यानंतर त्याने आठ आंतरराष्ट्रीय सामने जिंकले, ज्यामध्ये नेहरू कप (१९८७ आणि १९९१), १९९१ च्या ड–ऋ गेम्स आणि १९९२ च्या आशियाई कप



पात्रता फेरीच्या दोन आवृत्त्यांमध्ये त्याने खेळले. पाशाने आपला फुटबॉल प्रवास उत्तर बेंगळुरूमधील व्यालिकवल येथील विनायक फुटबॉल क्लबमधून सुरू केला, जिथे तो राहत होता. त्याच्या सातत्यपूर्ण कामगिरीमुळे लवकरच तो १९८० च्या दशकाच्या मध्यात इंडियन टेलिफोन इंडस्ट्रीजमध्ये गेला, हा काळ राष्ट्रीय स्तरावर त्याचा उदय झाला. १९८७ पासून, तो संतोष ट्रॉफीमध्ये कर्नाटकचा नियमित खेळाडू बनला, १९८७ मध्ये कोलकाता, १९८८ मध्ये क्विलॉन (आता कोल्लम) आणि १९८९ मध्ये गुवाहाटी येथे झालेल्या स्पर्धांमध्ये राज्याचे प्रतिनिधित्व करत होता. गुवाहाटीमधील त्याची कामगिरी उल्लेखनीय ठरली, कारण कर्नाटक थोडक्यात अंतिम फेरीत पोहोचू शकला नाही. त्याने १९९३ आणि १९९५ मध्ये बंगालसोबत दोन संतोष ट्रॉफी जेतेपदेही जिंकली.

त्याच्या देशांतर्गत कामगिरीमुळे, पाशाला मोहम्मद स्पोर्टिंगने करारबद्ध केले, जिथे त्याने त्याची प्रतिष्ठा वाढवत राहिल्या, १९८९ मध्ये सैत नागजी ट्रॉफी आणि निझाम गोल्ड कप जिंकला. नंतर तो ईस्ट बंगालमध्ये सामील झाला, ज्यामुळे त्याच्या क्लब कारकिर्दीचा सर्वात निर्णायक टप्पा सुरू झाला.

१९९० च्या दशकाच्या सुरुवातीपासून ते दशकाच्या अखेरीस प्रतिष्ठित रेड अँड गोल्डचे प्रतिनिधित्व करणारा, पाशा क्लबच्या सर्वात यशस्वी युगांपैकी एकाचा अविभाज्य भाग बनला. १९९३–९४ च्या हंगामात त्याने ईस्ट बंगालचे नेतृत्व केले आणि दिवंगत प्रशिक्षक सुभाष भौमिक यांच्या नेतृत्वाखाली तो एक विश्वासार्ह व्यक्ती होता.

रेड अँड गोल्ड ब्रिगेडसोबत, त्याने पाच वेळा (१९९१, १९९३, १९९५, १९९६ आणि १९९८), पाच वेळा (१९९०, १९९१, १९९४, १९९५ आणि १९९७) आयएफए शील्ड आणि चार वेळा (१९९०, १९९१, १९९३ आणि १९९५) ड्युरंड कप जिंकला. त्यांच्या ट्रॉफी कॅबिनेटमध्ये दोन रोव्हर्स कप (१९९०, १९९४), फेडरेशन कप (१९९६), काठमांडू येथे ऐतिहासिक वाई वाई कप (१९९३), १९९०, १९९२, १९९५ आणि १९९७ मध्ये एअरलाइन्स ट्रॉफी जेतेपदे, बोर्डोलोई ट्रॉफी (१९९२), एटीपीए शील्ड (१९९२), कलिंगा कप (१९९३), मॅकडॉवेल ट्रॉफी (१९९५, १९९७) आणि १९९६–९७ हंगामातील सुपर कप यांचा समावेश होता.

१९९० मध्ये तो ईस्ट बंगालच्या तिहेरी मुकुट जिंकणाऱ्या प्रसिद्ध संघाचा सदस्य होता आणि १९९३ मध्ये वाई वाई कपमध्ये संघाला पहिले आंतरराष्ट्रीय विजेतेपद मिळवून दिले. १९९३–९४ च्या आशियाई कप विजेत्या कपमध्ये ईस्ट बंगालने इराकच्या अल झावरा एससीवर ६–२ असा सनसनाटी विजय मिळवला तेव्हा त्याने कर्णधाराचा आर्मबँड देखील घातला होता. २०१२ मध्ये ईस्ट बंगालकडून त्याला विशेष जीवनगौरव पुरस्कार मिळाला.

दुर्मिळ संयम आणि सातत्य राखणारा बचावपटू इलियास पाशा यांच्या निधनाबद्दल अखिल भारतीय फुटबॉल महासंघ भारतीय फुटबॉल बंधूंसोबत शोक व्यक्त करतो आणि खेळातील त्यांच्या चिरस्थायी योगदानाचा सन्मान करतो.

# ‘हिंद-दी-चादर’ शहीदी समागमासाठी नांदेडमध्ये आरोग्य यंत्रणा सज्ज

## १० लाखांहून अधिक भाविकांसाठी ५ दिवस व्यापक वैद्यकीय सेवा

**नांदेड प्रतिनिधी:** शीख धर्माचे नववे गुरु श्री गुरु तेग बहादुर यांच्या ३५० व्या शहीदी समागम- हिंद-दी-चादर शताब्दी कार्यक्रमाच्या पार्श्वभूमीवर नांदेड जिल्ह्यातील संपूर्ण आरोग्य यंत्रणा सज्ज झाली असून, लाखो भाविकांच्या आरोग्य सुरक्षेसाठी अत्यंत काटेकोर, बहुस्तरीय व समन्वयित वैद्यकीय व्यवस्थापन उभारण्यात आले आहे.

२४ व २५ जानेवारी २०२६ रोजी नांदेड शहरात होणाऱ्या मुख्य सोहळ्यासाठी राज्यभरासह देशाच्या विविध भागांतून १० लाखांपेक्षा अधिक भाविक सहभागी होण्याची शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर २२ ते २६ जानेवारी २०२६ या पाच दिवसांच्या कालावधीत अखंड आरोग्य सेवा उपलब्ध असणार आहे.

**मुख्यमंत्री कार्यालयाच्या निर्देशानुसार सूक्ष्म नियोजन**

मुख्यमंत्री कार्यालयाच्या स्पष्ट निर्देशानुसार विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर, जिल्हाधिकारी राहुल कर्डिले तसेच मुख्यमंत्री कार्यालयातील मुख्य समन्वयक डॉ. रामेश्वर नाईक यांच्या मार्गदर्शनाखाली आरोग्य व्यवस्थापनाबाबत सविस्तर कृती आराखडा तयार करण्यात आला आहे. यासाठी जिल्हास्तरीय आरोग्य व्यवस्थापन समिती गठीत करून वारंवार आढावा बैठका घेण्यात आल्या आहेत.




**शासकीय–खाजगी आरोग्य यंत्रणांचा समन्वय**

या नियोजनात जिल्ह्यातील सर्व शासकीय आरोग्य संस्था, जिल्हा शल्यचिकित्सक कार्यालय, जिल्हा परिषद आरोग्य विभाग, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय विष्णुपुरी, शासकीय आयुर्वेद महाविद्यालय यांचा सहभाग आहे. यासोबतच नांदेड व परभणी जिल्ह्यातील महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना आणि मुख्यमंत्री सहाय्यता निधी योजनेशी संलग्न असलेली खाजगी रुग्णालयेही आरोग्य सेवा देणार आहेत.

**कार्यक्रमस्थळी अत्याधुनिक आरोग्य सुविधा**

मुख्य कार्यक्रमस्थळी दोन स्वतंत्र बाह्यरुग्ण विभाग (ओपीडी) उभारण्यात येणार असून, येथे विविध तज्ज्ञ डॉक्टरांच्या माध्यमातून पुढील सेवा दिल्या जाणार आहेत. असंसर्गजन्य आजारांची तपासणी, कर्करोग व दंतरोग तपासणी, महिलांच्या आजारांची विशेष तपासणी, मोफत वैद्यकीय सल्ला व औषधोपचार तसेच तातडीची संदर्भ सेवा व २४ तास रुग्णवाहिका सुविधा,नेत्र तपासणी, मोफत चष्मे व ज्येष्ठांसाठी सहाय्य, मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षामार्फतही मोफत नेत्र तपासणी शिबिरे, गरजूंना मोफत चष्म्यांचे वाटप तसेच तपासणीनंतर गरजू ज्येष्ठ नागरिकांना काठ्यांचे वितरण केले जाणार आहे. मार्ग, पार्किंग व निवासस्थळी वैद्यकीय पथकेभाविकांच्या सोयीसाठी नांदेड शहरातील प्रमुख प्रवेश मार्ग, वाहन पार्किंग क्षेत्रे, तसेच तात्पुरत्या निवासस्थळी वैद्यकीय पथके, प्राथमिक उपचार केंद्रे व रुग्णवाहिका सेवेत असणार येणार आहेत.

**जिल्हाभर विशेष आरोग्य शिबिरांचे आयोजन**

या ऐतिहासिक कार्यक्रमाच्या पार्श्वभूमीवर जिल्हा, तालुका व ग्रामीण स्तरावर सिकल सेल तपासणी, रक्तक्षय (ॲनिमिया) तपासणी, क्षयरोग (टीबी) रुग्ण तपासणी, असंसर्गजन्य आजार तपासणी, बाल आरोग्य तपासणी (आर,के,एस,के.), आभा कार्ड नोंदणी, अशी विशेष आरोग्य शिबिरे मोठ्या प्रमाणावर आयोजित करण्यात आली आहेत.

**रुग्णालयांत विशेष राखीव खाटा**

आपत्कालीन परिस्थितीत तत्काळ उपचार मिळावेत यासाठी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय विष्णुपुरी, जिल्हा रुग्णालय नांदेड व शासकीय आयुर्वेद महाविद्यालय येथे विशेष राखीव खाटांचे नियोजन करण्यात आले आहे.

**तज्ज्ञांचे मार्गदर्शन**

या संपूर्ण वैद्यकीय व्यवस्थापनासाठी मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षातील डॉ. जगदीश सकवान, डॉ. भूषण जैन व डॉ. रितेश पाटील यांचे मार्गदर्शन आणि सहकार्य आरोग्य व्यवस्थापन समितीस मिळत आहे.

**लाखो भाविकांच्या आरोग्यासाठी प्रशासन सज्ज**

हिंद–दी–चादर शताब्दी समागमाच्या निमित्ताने नांदेड जिल्हा प्रशासनाने उभारलेली ही आरोग्य व्यवस्था लोकांच्या आरोग्य सुरक्षेला सर्वोच्च प्राधान्य देणारी आदर्श व्यवस्था ठरणार आहे.

# यशवंत ग्रुपचे संस्थापक संचालक उद्योजक देविदास नाबदे यांचा जाहीर सत्कार



**लातूर प्रतिनिधी:** लातूर येथील भूमीपुत्र व चाकण औद्योगिक क्षेत्रातील यशवंत ग्रुपचे संस्थापक संचालक मा. श्री. देविदास गंगाराम नाबदे यांचा जाहीर सत्कार समारंभ मोठ्या उत्साहात पार पडला. हा कार्यक्रम राष्ट्रीय चर्मकार महासंघ (अहिल्यानगर) चे श्री. सिकंदर पुंडलिक वाकरे व माजी प्राचार्य श्री. संजय लक्ष्मण कानडे यांच्या हस्ते संपन्न झाला.

या सत्कारप्रसंगी मारुती वाकरे (उपसरपंच, तिपराळ), इंजि. प्रशांत वाकरे, इंजि. नितीन नाबदे, इंजि. आशिष नाबदे, बळीराम धायगोंडे, प्रल्हाद चित्ते सर यांच्यासह अनेक मान्यवर व स्थानिक नागरिक उपस्थित होते. कोणतीही औद्योगिक पार्श्वभूमी नसताना शून्यातून यशवंत ग्रुपची स्थापना करून देविदास नाबदे यांनी चाकण परिसरात आदर्श उद्योजक म्हणून स्वतःची ओळख निर्माण केली आहे. त्यांच्या उद्योगसमूहातून सुमारे २०० कुटुंबांना थेट रोजगार उपलब्ध झाला असून कामगारहितैषी धोरणांमुळे ते उद्योग क्षेत्रात विशेष मानाने ओळखले जातात.

कार्यक्रमात बोलताना श्री. सिकंदर वाकरे यांनी नाबदे यांच्या उद्यमशीलतेचा, रोजगारनिर्मितीच्या ध्येयाचा व कामगार कल्याणाविषयीच्या संवेदनशीलतेचा गौरव केला. शून्यातून विश्व उभारणारे देविदास नाबदे हे युवकांसाठी प्रेरणास्थान असल्याचे त्यांनी नमूद केले. माजी प्राचार्य श्री. संजय कानडे यांनी कामगारांच्या सुखदुःखात सहभागी होणारे व समाजहित जपणारे देविदास नाबदे हे खऱ्या अर्थाने देवतुल्य असल्याचे मत व्यक्त केले. या जाहीर सत्कार समारंभाच्या निमित्ताने देविदास नाबदे यांना त्यांच्या भावी उपक्रमांसाठी उपस्थित मान्यवरांनी हार्दिक शुभेच्छा दिल्या.

# पंजाबचे मुख्यमंत्री भगवंत मान यांचा नांदेड दौरा

**नांदेड प्रतिनिधी:** पंजाब राज्याचे मुख्यमंत्री भगवंत मान हे दिनांक २३ व २४ जानेवारी २०२६ रोजी नांदेड जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत आहेत. त्यांच्या दौरा कार्यक्रमाचा तपशील पुढीलप्रमाणे आहे.

शुक्रवार, दि. २३ जानेवारी २०२६ रोजी मुख्यमंत्री भगवंत मान हे दिल्ली येथून दुपारी १.३० वाजता विमानाने प्रयाण करून दुपारी ३.०५ वाजता नांदेड येथील गुरु गोविंद सिंगजी विमानतळ येथे आगमन करतील. त्यानंतर ते नांदेड येथील विविध स्थानिक कार्यक्रमांना उपस्थित राहणार असून त्यांचा नांदेड येथे मुक्काम राहील. शनिवार, दि. २४ जानेवारी २०२६ रोजी मुख्यमंत्री भगवंत मान हे नांदेड येथून गुरु गोविंद सिंगजी विमानतळाकडे प्रयाण करतील. सकाळी ११.०० वाजता नांदेड विमानतळ येथून विमानाने पाटणाकडे प्रयाण करतील.

# हिंद दी चादर शहीदी समागम कार्यक्रम यशस्वीतेसाठी सर्वांनी पुढाकार घ्यावा : प्रधान सचिव श्रीकर परदेशी

**नांदेड प्रतिनिधी:** नांदेड येथे २४ व २५ जानेवारी रोजी ‘हिंद दी चादर’ श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांच्या ३५० व्या शहीदी समागमाचा कार्यक्रम होत आहे. जागतिक स्तरावरील हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सर्व यंत्रणांनी समन्वयाने काम करावे. सर्व भाविकांची व्यवस्था चोख होईल याकडे जिल्हा प्रशासनाने लक्ष द्यावे अशा सूचना मुख्यमंत्री कार्यालयाचे प्रधान सचिव श्रीकर परदेशी यांनी दिल्या.



जिल्हाधिकारी कार्यालयात हिंद दी चादर श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांच्या ३५० व्या शहीदी समागम कार्यक्रमाच्या तयारीचा मुख्यमंत्री कार्यालयाचे प्रधान सचिव श्रीकर परदेशी यांनी दूरदृष्य प्रणालीद्वारे (व्हिडिओ कॉन्फरन्स) (दि.२१) सविस्तर आढावा घेतला. या बैठकीत छत्रपती संभाजीनगर विभागाचे विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर, नांदेड परिक्षेत्राचे विशेष पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप, जिल्हाधिकारी राहुल कर्डिले, पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार, मनपा आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे, शहीदी समागम राज्यस्तरीय समितीचे समन्वयक रामेश्वर नाईक, गुरुद्वारा बोर्डाचे प्रशासक डॉ. विजय सतबीर सिंग, अपर जिल्हाधिकारी रत्नदीप गायकवाड, समितीचे शासकीय समन्वयक डॉ.जगदीश सकवान, संबंधित जिल्ह्यांचे जिल्हाधिकारी, विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी सहभागी झाले होते. श्री. परदेशी यांनी छत्रपती संभाजीनगर विभागाचे विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर, मराठवाड्यातील सर्व जिल्हाधिकाऱ्यांशी कार्यक्रमाच्या तयारीबाबत विचारणा केली. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी योग्य नियोजन करावे, अशा सूचना केल्या. जिल्हाधिकारी श्री. कर्डिले यांनी सांगितले की, मोदी मैदानावरील कार्यक्रम ठिकाणच्या परिसरात ५२ एकर मैदानावर भाविकांसाठी आवश्यक त्या सुविधा उभारण्यात येत आहेत. प्रशासनाने यासाठी सूक्ष्म नियोजन केले असून तयारी अंतिम टप्प्यात आहे. भाविकांच्या वाहनांसाठी स्वतंत्र पार्किंग व्यवस्था, मैदानालगत दोन टेन्ट सिटी, त्यामध्ये सुमारे १४ हजार भाविकांची निवास क्षमता, हॉटेल्स, शहरातील मंगल कार्यालये व शाळांमध्येही निवास व्यवस्था करण्यात आली आहे. या सर्व सुविधांसाठी नोडल अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आल्याचेही ते म्हणाले.

गुरुद्वारा बोर्डाचे प्रशासक डॉ. विजय सतबीर सिंग यांनीही कार्यक्रमाच्या आयोजनाबाबत माहिती दिली. श्री. नाईक यांनी हा कार्यक्रम नऊ समाजातील प्रत्येक घरापर्यंत पोहोचविण्यासाठी प्रशासन, समाज मिळून प्रयत्न करत आहे. या कार्यक्रमाचा सर्वांनी लाभ घ्यावा या दृष्टीने जनजागृती व्हावी. यासह शालेय स्तरापासून महाविद्यालयापर्यंत आयोजित करण्यात आलेल्या विविध स्पर्धा यामध्ये विद्यार्थ्यांची संख्या अधिकाधिक असावी, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.

# राजा राममोहन रॉय ग्रंथालय प्रतिष्ठान अंतर्गत ५२ व्या ग्रंथभेट योजनेसाठी सन २०२५ या कॅलेंडर वर्षातील प्रकाशित ग्रंथ सादर करण्याचे आवाहन

**लातूर प्रतिनिधी:** राजा राममोहन रॉय ग्रंथालय प्रतिष्ठान, कोलकत्ता व राज्य शासन यांच्या संयुक्त विद्यमाने समान निधी ‘ ग्रंथभेट’ योजनेतंर्गत सन २०२५ या कॅलेंडर वर्षात प्रकाशित झालेली मराठी, हिंदी व इंग्रजी भाषेतील ग्रंथ खरेदी करुन राज्यातील शासनमान्य ग्रंथालयांना भेट म्हणून देण्यात येणार येतात.

या योजनेतंर्गत खरेदी करण्यात येणाऱ्या ग्रथांची निवड करण्यासाठी तसेच ग्रंथालय स्तरावरुन प्रसिध्द होणाऱ्या ‘ शासनमान्य ग्रंथ निवड यादी’ मध्ये समावेश होण्याच्या दृष्टीने सन २०२५ कॅलेंडर वर्षात दि. १ जानेवारी, २०२५ ते दि. ३१ डिसेंबर, २०२५ प्रकाशित झालेल्या व प्रथम आवृत्ती असलेल्या ग्रंथांची प्रत्येकी एक विनामुल्य प्रत ग्रंथालय संचालक, ग्रंथालय संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्याकडे २८ फेब्रुवारी, २०२६ पर्यंत सादर करणे आवश्यक आहे.

२८ फेब्रुवारी, २०२६ नंतर प्राप्त झालेलया ग्रंथांचा ग्रंथ निवड यादीसाठी विचार केला जाणार नाही. या योजनेसाठी सन २०२५ या वर्षात प्रकाशित झालेले ग्रंथ जर यापूर्वी संचालनालयास पाठविले असल्यास पुन्हा पाठविण्याची आवश्यकता नाही.

तसेच मुद्रण व नोंदणी अधिनियम, १८६७ अन्वये मुद्रकाने व ग्रंथ प्रदान अधिनियम, १९५४ अन्वये प्रकाशकाने सदर ग्रंथांची प्रत्येकी एक प्रत राज्य मध्यवर्ती ग्रंथालय, नगर भवन, मुंबई , शासकीय विभागीय ग्रंथालय, पुणे व शासकीय विभागीय ग्रंथालय नागपूर येथे पाठविणे आवश्यक आहे. सदर ग्रंथ पोहोचल्याची पोच पावती संबंधीत ग्रंथालयांकडून घ्यावी. ग्रंथालय संचालनालयास संबंधित ग्रंथ पाठवितांना वरीलप्रमाणे ग्रंथ पाठविल्याची पोच पावती ग्रंथासोबत टपालामार्फत वा समक्ष पाठविण्यात यावी. सर्व लेखक, प्रकाशक यांनी ग्रंथ पाठविण्याचे आवाहन ग्रंथालय संचालक यांनी केले आहे.

# उत्कृष्ट कामगिरीसाठी सोलापूर विभागाच्या ९ रेल्वे कर्मचाऱ्यांना विशिष्ट रेल सेवा पुरस्कार प्रदान

# मध्य रेल्वेच्या सोलापूर विभागाला ७० व्या विशिष्ट रेल सेवा पुरस्कार २०२५ मध्ये कार्यक्षमता आणि ट्रॅक मशीन शील्ड मिळाल

**सोलापूर प्रतिनिधी:** मध्य रेल्वेचे महाव्यवस्थापक श्री विवेक कुमार गुप्ता यांनी २१ जानेवारी २०२६ रोजी मुंबई, सीएसएमटी येथील मध्य रेल्वे सभागृहात आयोजित समारंभात, उत्कृष्ट कामगिरीबद्दल ९८ व्यक्तींना ७० वा विशिष्ट रेल सेवा पुरस्कार २०२५ आणि विविध विभाग/कार्यशाळा/स्थानकांना २४ शील्ड प्रदान केले.

मध्य रेल्वेच्या सोलापूर विभागाने कार्यक्षमता शील्ड आणि ट्रॅक मशीन शील्ड जिंकले, जे विभागीय रेल्वे व्यवस्थापक (डीआरएम), सोलापूर डॉ. सुजीत मिश्रा आणि त्यांच्या संघाने स्वीकारले. महाव्यवस्थापकांनी सोलापूर विभागाच्या ९ रेल्वे कर्मचाऱ्यांना त्यांच्या प्रशंसनीय कामगिरीबद्दल वैयक्तिक पुरस्कार श्रेणीमध्ये विशिष्ट रेल सेवा पुरस्कार देऊन सन्मानित केले.

**सोलापूर विभागातील पुरस्कार विजेते खालीलप्रमाणे आहेत:**

१. श्री आदित्य त्रिपाठी, वरिष्ठ विभागीय वित्त व्यवस्थापक (Sr DFM), लेखा विभाग
२. श्री राहुल सुदाम कांबळे, ट्रेन तिकीट निरीक्षक (TTI), वाणिज्य विभाग
३. श्री संतोष विठ्ठल काटकर, ट्रॅक मेंटेनर-II, स्थापत्य अभियांत्रिकी विभाग
४. श्री हंदरगुळे विशाल सूर्यकांत, ट्रॅक मेंटेनर-IV, स्थापत्य अभियांत्रिकी विभाग
५. श्री अखिल बशीर शेख, ट्रॅक मेंटेनर-I, स्थापत्य अभियांत्रिकी विभाग
६. श्री महबूब के नदाफ, वरिष्ठ तंत्रज्ञ (फिटर), यांत्रिक विभाग
७. श्री संजीवकुमार वैजनाथराव अर्धापुरे, स्टेशन अधीक्षक (SS), परिचालन विभाग
८. श्री विजय सूर्यभान यादव, मुख्य डेपो मटेरियल अधीक्षक (CDMS), स्टोअर्स विभाग, कुर्डुवाडी कार्यशाळा
९. श्री रवींद्र शंकर राठोड, वरिष्ठ तंत्रज्ञ (वेल्डर), कुर्डुवाडी कार्यशाळा (नागरी संरक्षण)

या प्रसंगी बोलताना महाव्यवस्थापकांनी ’अति विशिष्ट रेल सेवा पुरस्कार’ विजेत्यांचे आणि नवी दिल्ली येथे नुकतेच ५ शील्ड जिंकणाऱ्या संबंधित मध्य रेल्वेच्या संघांचे अभिनंदन केले. रेल्वे बोर्ड स्तरावर ५ शील्ड जिंकणे ही स्वतःच एक मोठी कामगिरी आहे, असेही ते म्हणाले. श्री. गुप्ता म्हणाले की, लोकांना रेल्वेकडून खूप अपेक्षा आहेत आणि म्हणूनच त्या पूर्ण करण्यासाठी, माननीय रेल्वेमंत्र्यांनी सर्व रेल्वे कर्मचाऱ्यांनी अवलंबण्यासाठी काही उपाययोजना तयार केल्या आहेत.




✻ २०२६ वर्षासाठी ‘५२ आठवड्यांत ५२ सुधारणा’ हे लक्ष्य निश्चित केले आहे.
✻ प्रवासी, रेल्वे कर्मचारी आणि रेल्वेची मालमत्ता व प्रणाली यांच्या सुरक्षेवर लक्ष केंद्रित केले.
✻ वेगवान काळासोबत राहण्यासाठी तंत्रज्ञान, नवोपक्रम आणि कृत्रिम बुद्धिमत्तेचा (AI) अवलंब करणे.
✻ देखभाल पद्धतींचे आधुनिकीकरण,
✻ प्रशिक्षणाचे मापदंड सुधारणे आणि कौशल्य विकासावर लक्ष केंद्रित करणे, आणि
✻ बदलत्या काळासोबत चालण्यासाठी जुनी मानसिकता बदलणे.

त्यांनी सर्व पुरस्कार विजेत्यांचे अभिनंदन केले आणि सर्व प्रधान विभागप्रमुख, विभागीय रेल्वे व्यवस्थापक, अधिकारी आणि कर्मचारी यांचा समावेश असलेल्या सक्षम कार्यशक्तीचा आपल्याला अभिमान असल्याचे सांगितले. त्यांनी यावेळी पुरस्कार न मिळालेल्यांनाही प्रोत्साहनपर शब्दांनी प्रेरित केले. यश मिळवण्यासाठी समर्पण आणि समान ध्येय समोर ठेवून एकसंघपणे काम करण्याच्या महत्त्वावर त्यांनी भर दिला. ते म्हणाले, हे पुरस्कार या कल्पनेला बळकटी देतात की कठोर परिश्रम आणि समर्पणाला महत्त्व दिले जाते आणि त्याचे कौतुक केले जाते आणि त्याचे फळ लवकरच मिळेल. यावेळी अतिरिक्त महाव्यवस्थापक (एजीएम) श्री. प्रतीक गोस्वामी, प्रधान मुख्य कार्मिक अधिकारी (पीसीपीओ) श्री. पी. पी. पांडे, सर्व प्रधान विभागप्रमुख (पीएचओडी), विभागीय रेल्वे व्यवस्थापक (डीआरएम) आणि मध्य रेल्वेचे इतर अधिकारी, मध्य रेल्वे महिला कल्याण संघटनेचे (सीआरडब्ल्यूडब्ल्यूओ) अध्यक्ष आणि कार्यकारी समिती सदस्य, तसेच मान्यताप्राप्त युनियनचे प्रतिनिधी उपस्थित होते.

या कार्यक्रमापूर्वी मध्य रेल्वे सांस्कृतिक अकादमीच्या कलाकारांनी सांस्कृतिक कार्यक्रम सादर केला. संपूर्ण कार्यक्रम यूट्यूब चॅनलवर थेट प्रक्षेपित करण्यात आला. जनसंपर्क विभागाने कार्यक्रम थेट पाहण्यासाठी स्कॅन करण्यायोग्य क्यूआर कोडची प्रणाली सुरू केली होती.

# लातूर जिल्हास्तरीय गायन स्पर्धा उत्साहात; विद्यार्थ्यांनी गीतांमधून मांडला श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांचा जीवनपट

**लातूर प्रतिनिधी:**

लातूर, दि. २२ : ‘हिंद दी चादर’ श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांच्या ३५० व्या शहीदी समागमानिमित्त लातूर जिल्हा शिक्षण विभागामार्फत ज्ञानप्रकाश शिक्षण संकुलात ‘हिंद दी चादर’ गायन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत उत्साहाने भाग घेत विद्यार्थ्यांनी गीतांमधून श्री गुरु तेग बहादूरजी यांच्या जीवनातील त्याग, बलिदान आणि शौर्य यांची प्रभावी मांडणी केली.



श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांना ‘हिंद दी चादर’ म्हणून ओळखले जाते, त्यांनी मानवता आणि धार्मिक स्वातंत्र्याच्या रक्षणासाठी आपले सर्वस्व पणास लावले. या स्पर्धेमुळे विद्यार्थ्यांमध्ये श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांच्या आदर्शांचा आणि त्यांच्या अमर बलिदानाचा संदेश पोहचला. स्पर्धेत सादर केलेल्या गीतांमधून श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांचा जीवनपट उलगडला गेला.

समग्र शिक्षा अभियानचे चंद्रकांत ठाकरे यांनी या स्पर्धेचे समन्वयक म्हणून काम पहिले. तसेच संगीत शिक्षक विश्वजीत पांचाळ आणि शाहीर श्रीमती ॲड. अपेक्षा डाके यांनी परीक्षक म्हणून काम पहिले.

जिल्हा शिक्षण विभागाने या उपक्रमाद्वारे विद्यार्थ्यांमध्ये ऐतिहासिक जाणीव, धार्मिक सद्भावना आणि बलिदानाच्या मूल्यांची ओळख करून देण्याचा प्रयत्न केला आहे. या स्पर्धेत सहभागी सर्व विद्यार्थ्यांनी सर्जनशील आणि उत्साहपूर्ण वातावरणात गीत गायनाचे कौशल्य सादर केले. श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांच्या ३५० व्या शहीदी समागम वर्षानिमित्त लातूर जिल्ह्यात विविध स्पर्धा आणि जनजागृती उपक्रम राबविले जात आहे. यानिमित्ताने राज्य शासनाच्या अल्पसंख्याक विकास विभागामार्फत २४ व २५ जानेवारी २०२६ रोजी नांदेड येथे आयोजित विशेष कार्यक्रमाची माहिती नागरिकांपर्यंत पोहोचविली जात आहे.



# लातूर रेल्वेस्थानकाला ऋषितुल्य शिवराज पाटील चाकूरकरांचे नाव देण्यात यावे - ह.भ.प.गुरुबाबा महाराज औसेकर



**लातूर /प्रतिनिधी:** मी राजकारणात नसलो तरी माझे आवडते नेते शिवराज पाटील चाकूरकर हे आहेत. बोले तैसे चाले त्यांची वंदावी पावले. या उक्तीनुसार माजी केंद्रीय गृहमंत्री शिवराज पाटील चाकुरकर यांनी प्रत्येक लातूरकरांना आपलेसे करून आपली राजकीय वाटचाल यशस्वीपणे सुरू ठेवण्याचे कार्य केले. त्यांच्या पुण्य स्मरणार्थ हा दिनदर्शिकेचा भव्य प्रकाशन सोहळा मोठ्या उत्साहात संपन्न झाला आहे. त्यांच्या आणि माझ्या परिवाराचे संबंध ऋणानुबंधासारखे कायम गठ्ठ आहेत. त्यांच्या भेटीसाठी जेव्हा मी वेळावेळी आलो तेव्हा त्यांच्याकडून काहीतरी वेगळे शिकण्याची संधी आपल्याला मिळालेली आहे. त्यांचे कार्य एका दिनदर्शिकेपुरते मर्यादित नाही. त्यामुळे त्यांचे नाव देशात आणि जगात व्हावे. मी खासदार डॉ.काळगे साहेबांना सांगतो की, मी आपणांकडे यापूर्वीही काही मागितले नाही आणि भविष्यातही काही मागणार नाही. परंतु चाकूरकर साहेबांच्या आठवणी जगभरात कायम रहाव्यात यासाठी लातूर रेल्वेस्थानकाला ऋषितुल्य व्यक्तिमत्त्व शिवराज पाटील चाकूरकर यांचे नाव देण्याचे कार्य आपण करावे. असे प्रतिपादन ह.भ.प.गुरूबाबा महाराज औसेकर यांनी केले.

यावेळी ते आदर्श कॉलनी भागातील बसवेश्वर नगर येथील देवघर निवासस्थानी आयोजित शिवराज पाटील चाकूरकर यांच्या जीवन परिचय गौरव बसव दिनदर्शिका -२०२६ च्या विशेषांक प्रकाशन सोहळ्याप्रंसगी बोलत होते. यावेळी या कार्यक्रमाला लातूरचे खासदार डॉ.शिवाजी काळगे, मराठवाडा शिक्षक आमदार विक्रम काळे, माजी आ.धर्माजी सोनवकडे, अ‍ॅड. व्यंकट बेद्रे, अ‍ॅड.बळवंतराव जाधव, शैलेश पाटील चाकूरकर, अ‍ॅड.बी.व्ही.मोतीपवळे, भाजपा नेत्या अर्चनाताई पाटील चाकूरकर, शिवा लिंगायत युवा संघटनेचे संस्थापक अध्यक्ष दयानंद पाटील, अहमदपूरचे नगराध्यक्ष स्वप्निल व्हते आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी पुढे बोलताना ह.भ.प.गुरूबाबा महाराज औसेकर म्हणाले की, शिवराज पाटील चाकूरकर हे ऋषितुल्य व्यक्तिमत्व होते. त्यांनी आपल्या कार्यातून लातूरची ओळख जगभरात पोहचविण्याचे काम केले. लातूरचे नगराध्यक्ष ते खासदार, केंद्रीय गृहमंत्री, लोकसभा सभापती, ते पंजाबचे राज्यपाल म्हणून त्यांनी यशस्वीपणे काम केलेले आहे. त्यांच्यावर अनेक वेळा विरोधकाकडून टिकाही झाल्या. परंतु त्या टिकेला उत्तर न देता सकारात्मक पध्दतीने राजकीय क्षेत्रामध्ये काम करण्याचे कौशल्य त्यांनी कायम जोपासण्याचे काम केले. त्यामुळे अशा या महान व्यक्तीमत्वाला राजकारणापुरते मर्यादित न ठेवता त्यांच्या विचारावर आजच्या राजकीय क्षेत्रातील तरुणाईने यशस्वी वाटचाल करावी, असे आवाहनही त्यांनी यावेळी बोलताना केले.



कार्यक्रमाच्या प्रारंभी बसव दिनदर्शिका-२०२६ या शिवराज पाटील चाकूरकर यांच्या जीवनचरित्रावरील ऐतिहासिक दिनदर्शिकेचे प्रकाशन प्रमुख मान्यवरांच्याहस्ते करण्यात आले. यावेळी प्रातिनिधीक स्वरुपात खासदार डॉ.शिवाजी काळगे, प्रा.डॉ.बी.व्ही.मोतीपवळे, शिक्षक अमदार विक्रम काळे यांनीही शिवराज पाटील चाकूरकर यांच्या कार्यावर प्रकाश टाकला. यावेळी या कार्यक्रमाला विविध क्षेत्रातील मान्यवर व चाकूरकर परिवारावर प्रेम करणारे नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# विश्वशांतीसाठी मैत्र भावाचा जीवनमार्ग स्वीकारायला हवा

## सुप्रसिद्ध साहित्यिक डॉ. विश्वाधार देशमुख

**लातूर/प्रतिनिधी:** तिसऱ्या महायुद्धाच्या उंबरठावर असलेल्या जगाला विश्वशांती विश्व कल्याणासाठी मैत्र भावाचा जीवन मार्ग स्वीकारायला हवा असे प्रतिपादन सुप्रसिद्ध साहित्यिक तथा वक्ते डॉ विश्वाधार देशमुख यांनी केले. ते येथील महात्मा बसवेश्वर महाविद्यालयात आयोजित महात्मा बसवेश्वर व्याख्यानमालेच्या पहिल्या विचारपुष्पात भूता परस्परे जडो, मैत्र जीवांचे या विषयावर मार्गदर्शन करत होते.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्थेचे अध्यक्ष आदिनाथ सांगवे हे होते तर विचारपिठावर उद्घाटक म्हणून शिक्षण संस्थेचे सचिव माधवराव पाटील टाकळीकर, सहसचिव सुनील मिटकरी, महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. आनंद शेवाळे, मुख्य समन्वयक डॉ. नल्ला भास्कर रेड्डी, कनिष्ठ महाविद्यालयाचे पर्यवेक्षक प्रा. नितीन वाणी व्याख्यानमालेचे संयोजक डॉ. रत्नाकर बेडगे आदीची उपस्थिती होती.

कार्यक्रमाच्या प्रारंभी जगतज्योती महात्मा बसवेश्वर यांच्या प्रतिमेचे पूजन व दीप प्रज्वलनाने व्याख्यानमालेचे उद्घाटन झाले.

पुढे बोलताना डॉ. विश्वाधार देशमुख म्हणाले की, जग जिंकण्याकरिता युद्धाचा, कौर्याचा आणि कायद्याचा मार्ग असे अनेक मार्ग आहेत. पण करुणा, मैत्री, स्नेह, सौजन्य, सहिष्णुतेचा मार्ग अत्यंत सोपा आणि साधा असा मार्ग आहे. यातून व्यक्ती, समाज व राष्ट्राचे जीवन अधिकाधिक समृद्ध, सुखमय व आनंदी होईल. प्रत्येकाने काळजातला द्वेष संपवून मी पणा विसर्जित करावा लागेल. समाजाचे नेतृत्व शिक्षकांच्या हाती दिल्यास शुद्ध चारित्र्याची माणसे तयार होऊन समाजातला मैत्र भाव आपोआप वाढेल. आई वडील, पती-पत्नी, शिक्षक विद्यार्थी, पालक पाल्य, मित्र मैत्रीण ही नाती मानवी जीवन समृद्ध करतात. श्रीकृष्ण, तथागत गौतम बुद्ध, महात्मा बसवण्णा, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचार तत्त्वज्ञानात संत ज्ञानेश्वरांचा मैत्र भाव आपणास दिसून येतो असेही ते म्हणाले. आपल्या उद्घाटपर मार्गदर्शनात शिक्षण संस्थेचे सचिव माधवराव पाटील टाकळीकर म्हणाले



की, तथागत गौतम बुद्ध, महात्मा बसवेश्वर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी मानवतावादी धर्माचा स्वीकार करून जगाला स्नेह, प्रेम, आणि करुणेचा संदेश दिला. व्यक्तीने चराचरातील सर्वांकडे मैत्र भावनेतून पाहिले पाहिजे. तरच जगाचा उद्धार होईल असेही ते म्हणाले. अध्यक्षीय समारोपात महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्थेचे अध्यक्ष आदिनाथ सांगवे म्हणाले की, महात्मा बसवेश्वरांनी १२ व्या शतकात समतेचा संदेश जगाला दिला. वर्ण, जात, धर्म, वंश आणि वर्ग असा भेदभाव न करता सर्वांवर प्रेम करण्याचा संदेश दिला. देह हेच देवालय आहे, आत्मा हा परमेश्वर आहे. सदाचार म्हणजे स्वर्ग आणि अनाचार म्हणजे नरक आहे. इतक्या साध्या सोप्या भाषेत काव्य कायकवे कैलास हा श्रमाच्या उपासणेचा मार्ग बसवण्णांनी सांगितला. त्यांच्या विचार तत्त्वज्ञान जीवनकार्याचा वसा-वारसा पुढच्या पिढींना सांगितला गेला पाहिजे असेही ते म्हणाले या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व स्वागतपर मनोगत महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. आनंद शेवाळे यांनी केले, प्रमुख अतिथीचा परिचय डॉ. मनोहर चपळे यांनी करून दिला, सूत्रसंचालन प्रा. किसनाथ कुडके व डॉ. अश्विनी रोडे यांनी केले तर आभार प्रा. व्यंकट दुडिले यांनी मानले. या कार्यक्रमला शहरातील मान्यवर, महाविद्यालयातील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# अल फारुख उर्दू विद्यालयात स्वयंशासन दिन साजरा

**नळेगाव/अजगर मजकुरे:**-नळेगाव येथील अल फारुख उर्दू विद्यालयात गुरुवारी (दि.२२) दहावीच्या विद्यार्थ्यांनी स्वयंशासनदिन साजरा केला. यावेळी मुख्याध्यापक तांबोळी सोहेल उपमुख्याध्यापक खुरैशी अरजान लिपिक म्हणून बागवान अफ्फान यांनी काम पाहिले. शिक्षक म्हणून दहावीच्या सर्व विद्यार्थ्यांनी अध्यापनाचा अनुभव घेतला. या कार्यक्रमास संस्था अध्यक्ष नजीब जागीरदार यांनी मार्गदर्शन केले. या वेळी विद्यार्थ्यांना माध्यमिक शाळेचे मुख्याध्यापक वहाब जागीरदार, प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक कादिर जागीरदार, मुजीब शेख, समद शेख, हुसेन घोरवाडे, युनूस शेख, इस्माईल सय्यद यांनी मार्गदर्शन केले. स्वयंशासनदिनाच्या यशस्वीतेसाठी हाश्मी मोईनोद्दीन, इरशाद पिरजादे,लायक सौदागर, मुंजेवार बाबू, साहेबलाल कुरैशी, इलयास शेख, नुरोद्दीन तांबोळी, फय्याज सय्यद,इनामदार उस्मान, जमील पटेल, महेबूब शेख, रफिक कासार सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व सर्व दहावीच्या विधार्थ्यांनी परिश्रम घेतले.




## शैली ...

हिंदू हृदयसम्राटांची
अद्भुत ठाकरे शैली
ती जनमानसा वरती
अविरत जादू केली

शब्दाशब्दांत जाणवे
मराठीमातीची ओली
दूरदर्शी विचार सार्थ
सागरा परिस खोली

उभे रहायची लकब
भाषणा आधी टाळी
ऐकता विचार धारा
लागे ब्रह्मानंदी टाळी

हतबध्द होती सगळे
टिकाकारांची टोळी
शरणागत उन्मत ते
पायावर घेती लोळी

भितीचा ना लवलेश
वाघ का घाबरे मुळी
शतहत्ती शक्ती मिळे
राहील कोण दुबळी

आयुर्भाव त्वेष जोश
भलेभले होती खुळी
विरोधक गप्पगुमान
अंगलट त्याची खेळी

विसरे ना कधी तुम्हां
आठवण मना जाळी
विचार आचारा येता
भगव्या नव झळाळी

**हेमंत मुसरीफ पुणे.**
९७३०३०६९९६.

# विद्यार्थ्यांनी जबाबदार नागरिक बनावे - पोलीस निरीक्षक अभिषेक शिंदे




**लातूर/प्रतिनिधी:** सायबर गुन्ह्यांपासून वाचण्यासाठी सतर्क राहा, अनोळखी लिंक उघडू नका, संशयास्पद फोन कॉल्स किंवा मेसेजकडे दुर्लक्ष करा. बँक तपशील, पासवर्ड, ओटीपी किंवा इतर कोणतीही वैयक्तिक माहिती कोणाशीही शेअर करू नका. कारण, यातून तुमची फसवणूक होऊ शकते. विद्यार्थ्यांनी जागरूक राहून जबाबदार नागरिक बनावे, असे आवाहन शिवाजीनगर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक अभिषेक शिंदे यांनी केले.

येथील राजमाता जिजामाता शैक्षणिक संकुलात सायबर क्राईम, महिला सुरक्षा आणि व्यसनमुक्ती या विषयांवर मार्गदर्शन करत गुरुवारी प्रमुख पाहुणे पोलीस निरीक्षक शिंदे यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे सचिव प्राचार्य डी. एन. केंद्रे होते. यावेळी संस्थेच्या अध्यक्षा के. ए. जायेभाये, प्राचार्य संगमेश्वर केंद्रे, उपप्राचार्य प्रा. कविता केंद्रे, संस्थेच्या संचालक अश्विनी केंद्रे, संचालक स्वाती घुले यांच्यासह एस. एम. गुरमे, मदन धुमाळ, ए. बी. मुंडे, सुधाकर लोहकरे, शिवकांत वाडीकर, विष्णू कराड, परमेश्वर गित्ते यांची उपस्थिती होती.

लातूर हे शैक्षणिक गुणवत्तेचे माहेरघर बनले आहे. त्यामुळे महाराष्ट्रातील विद्यार्थी शिक्षणासाठी येथे येतात. विद्यार्थ्यांच्या सुरक्षेसाठी लातूर पोलीस तत्पर आहेत. विद्यार्थ्यांनी भयमुक्त वातावरणात जिद्द आणि चिकाटी बाळगून यशाचे शिखर गाठावे, असे आवाहन प्राचार्य डी. एन. केंद्रे यांनी केले. सूत्रसंचालन समन्वयक राजीव मुंढे यांनी केले तर आभार के. आर. नवगरे यांनी मानले. कार्यक्रमास शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**मध्य रेल्वे**
**सोलापूर विभाग**
**ई-प्रोक्योरमेंट**

विभागीय स्टोअर कार्यालय, मध्य रेल्वे, सोलापूर आणि मा. भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने, सक्षम, प्रतिष्ठित कंपन्या/कंत्राटदारांकडून खालील कामांसाठी रेल्वेच्या ई-प्रोक्योरमेंट वेबसाइट **www.ireps.gov.in** वर ऑनलाइन ई-निविदा आमंत्रित करत आहेत. ०१. **निविदा क्रमांक:-** ९६२६५०११, ०२. **वर्णन:-** वस्तू, RDSO रेखाचित्र क्र. T5919 Alt-2 (नवीनतम बदल) नुसार आणि ERC साठी IRS तपशील S. No. T-31-2021- पाचवी सुधारणा (दुरुस्ती-२ आणि नवीनतम बदलांसह) नुसार इलास्टिक रेल क्लिप्स MKAV चे उत्पादन आणि पुरवठा. (**टीप:** जिथे जिथे मनवीनतम बदलफ हा शब्द वापरला आहे, त्याचा अर्थ निविदा बंद होण्याच्या प्रत्यक्ष तारखेपर्यंतचे बदल असा असेल.) ०३. **प्रमाण:-** १२०८४६ नग, ०४. **अनामत रक्कम (INR):-** रु. २४१४८०.००. **www.ireps.gov.in** वर निविदा बंद होण्याची तारीख आणि वेळ: ०४-०२-२०२६, रोजी ११:३० नंतर. संभाव्य निविदाकारांना सल्ला दिला जातो की, या निविदेसाठी जारी केलेले कोणतेही बदल/शुद्धिपत्रक पाहण्यासाठी निविदा बंद होण्याच्या तारखेपूर्वी वेबसाइटला वारंवार भेट द्यावी. वेबसाइट: **www.ireps.gov.in.**

**वरिष्ठ विभागीय सामग्री व्यवस्थापक**
05 **सोलापूर**

**धोकादायक आणि स्फोटक वस्तूंसह प्रवास करणे हा शिक्षेस पात्र गुन्हा आहे**

**महापारेषण**
महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित

**जाहीर आवाहन**

लातूर जिल्ह्यातील सर्व जनतेस नम्र आवाहन करण्यात येते की, लातूर जिल्ह्यातून महापारेषणच्या अनेक अति उच्च दाबाच्या वाहिन्या जसे २२० के.व्ही., १३२ के.व्ही., इत्यादी आपल्या गाव, शहर व शिवारातून जातात, तरी आपणास विनंती करण्यात येते की, आपण इंडियन इलेक्ट्रिसिटी रुल्स २०१० क. ८२ (ए) नुसार अति उच्च दाब वाहिनीच्या २७ मीटर (१३२ के.व्ही), ३५ मीटर (२२० के.व्ही) च्या सुरक्षित पटटयामध्ये (R.O.W) तसेच वाहिनीखाली झाडे, जास्त उंचीचे पिक घेऊ नये, घर बांधकाम करु नये, पिकांचा कचरा / गवताचे ढीग लाऊ नये किंवा जाळू नये, खोदकाम / खदान करु नये, जेसीबी सारखी उंच वाहने नेऊ नये, मनोऱ्यावर चढू नये व मनोऱ्यास गुरे ढोरे बांधू नये जेणेकरुन वाहिनीपासून योग्य ते सुरक्षित अंतर राखले जाईल व वाहिनी बंद पडून वीज पुरवठा खंडित होणार नाही किंवा जीवित व वित्त हानी होणार नाही.

महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीच्या अति उच्च दाबाच्या वाहिनीच्या सुरक्षा पट्यात व वाहिनीखाली वरील कोणतेही कृत्य करु नये. वरील कृत्य हे इंडियन इलेक्ट्रिसिटी रुल्स २०१० क. ८२ (ए) चे उल्लंघन करणारे आहे तसेच कारवाईस पात्र आहे. अशा कृत्यामुळे होणाऱ्या दुर्घटनेची कुठलीही जबाबदारी महापारेषण कंपनीची राहणार नाही याची सर्वांनी नोद घ्यावी. झाडे पिके किंवा बांधकाम इ. वरील प्रमाणे अति उच्च दाब वाहिनीच्या विद्युत प्रवर्तन (संपर्क) क्षेत्रामध्ये आल्यास विद्युत अपघात होऊन जीवित व वित्त हानी होण्याची शक्यता असते. तसेच अनेक गावांचा/ शहरांचा/ तालुक्यांचा विद्युत पुरवठा खंडीत होऊन महापारेषणचे लाखो रुपयांचे नुकसान होऊ शकते. याचे गांभीर्य लक्षात घेऊन महापारेषणतर्फे संबंधितांस वेळोवेळी सूचना/नोटीस दिलेल्या आहेत.

मागील वर्षभरात महापारोषणच्या वाहिनीखाली शेतातील पिकांच्या कचऱ्याचा ढीग, ऊस व केळीचे पाचट, गवत व कापसाचा कचरा जाळल्यामुळे तसेच जेसीबी सारखे उंच वाहने व घरांचे बांधकाम वाहिनीच्या विद्युतप्रवर्तन क्षेत्रामध्ये आल्यामुळे वाहिनी बंद (ट्रीप) झाल्याचे आढळून आले आहे.

लातूर जिल्ह्यातील प्रत्येक गावाला विद्युत पुरवठा करण्याकरिता या वाहिन्या सुस्थितीत राहणे अत्यंत महत्वाचे आहे. तरी आपणा सर्वांना पुनश्च विनंती आहे की, आपण अति उच्च दाब वाहिनीच्या सुरक्षित पट्ट्यामध्ये (R.O.W) तसेच वाहिनीखाली झाडे, जास्त उंचीचे पिक घेऊ नये, घर बांधकाम करु नये, पिकांचा कचरा/गवताचे ढीग लाऊ नये किंवा जाळू नये, खोदकाम / खदान करु नये, जेसीबीसारखी उंच वाहने नेऊ नये, मनोऱ्यावर चढू नये व मनोऱ्यास गुरे ढोरे बांधू नये जेणेकरुन वाहिनीपासून योग्य ते सुरक्षीत अंतर राखले जाईल व वाहिनीचे नुकसान/ वित्त हानी / जीवित हानी होणार नाही यासाठी सहकार्य करावे.

धन्यवाद.

**सही/-**
**कार्यकारी अभियंता,**
**अउदा संससु विभाग, महापारेषण, लातूर**

जावक क्रमांक ३७५/२०२६
**सार्वजनिक न्यास नौदणी कार्यालय,**
**लातूर सार्वजनिक न्यास नोंदणी हार्यालय, लातूर,**
२ रा मजला, दिवाणजी कॉम्पप्लेक्स,
आंबेजोगाई रोड.. लातूर,

## चौकशीची जाहीर नोटीस

एस.आर.एन.क्रमांक: LTR/04565/18/25
फेरफार अहवाल /अर्ज क्रमांक:.........................
सार्वजनिक न्यासाचे नाव व नोदणी क्रमांक **बिस्मिला दिनी ट्रस्ट गांजूर ता. चाकूर, जि. लातूर** बाबत ।
न्यासाचा पत्ता द्वारा **श्री पठाण रहीम सुलतानसाब,** मु.पो. गांजूर, ता. चाकूर, जि. लातूर.
अर्जदार **महताब हबीबसाब पठाण**
सर्व संबंधित लोकांस जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, सहायक धर्मादाय आयुक्त, लातूर, हे वर नमूद केलेला अर्ज यासंबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम १९ अन्वये खालील मुद्द्यांवर चौकशी करणार आहेत:-
(१) वर नमूद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय? आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरूपाचा आहे काय?
(२) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय?
**जंगम मिथकत (वर्णन)**

| अ.क्र. | तपशील | अंदाजे मूल्य |
|---|---|---|
| 1 | Deposit with President | 1000.00 |
| 2 | Life Membership fees | 3507.00 |
| 3 | NSC No 020185988416 | 1000.00 |

(अ) जंगम मिळकत: रोख रु. 5507/- मात्र
(अक्षरी रुपये पाच हजार पाच शे सात मात्र फक्त)
**स्थावर मिळकत (वर्णन)**

| अ.क्र. | शहर किंवा गांव | सी.एस किंवा महानगरपालिका किंवा सर्वेक्षण क्र. | क्षेत्र | मूल्यांकन | मुदत/कालावधी किंवा स्वरूप | अंदाजे मूल्य |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | None | None | None | None | None | None |

**(ब) स्थावर मिळकत:** रोख रु. ०/- मात्र
(अक्षरी रुपये मात्र फक्त)
सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची लेखी कैफियत ही नोटीस प्रसिद्ध झाल्या तारखेपासून तीस दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्यावर मिळेल अशा रितीने पाठवावी. त्यानंतर आलेल्या कैफियतींचा विचार केला जाणार नाही. तसेच मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.
ही नोटीस माझे सहीनिशी व या कार्यालयाचे शिक्यानिशी आज दिनांक १२-०१-२०२६ रोजी दिली.

स्वाक्षरित/-
**अधिक्षक**
**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय लातूर**

जावक क्रमांक ३७६/२०२६
**सार्वजनिक न्यास नौदणी कार्यालय,**
**लातूर सार्वजनिक न्यास नोंदणी हार्यालय, लातूर,**
२ रा मजला, दिवाणजी कॉम्पप्लेक्स,
आंबेजोगाई रोड.. लातूर,

## चौकशीची जाहीर नोटीस

एस.आर.एन.क्रमांक: LTR/04567/18/25
फेरफार अहवाल अर्ज क्रमांक:.........................
सार्वजनिक न्यासाचे नाव व नोदणी क्रमांक **असगर दिनी मदरसा ट्रस्ट गांजूर, ता. चाकूर, जि. लातूर** बाबत ।
न्यासाचा पत्ता द्वारा **श्री शेखदार गुलाब रम्हूसाब,** मु.पो. गांजूर, ता. चाकूर, जि. लातूर.
अर्जदार **जांगीर मजर शेखदार**
सर्व संबंधित लोकांस जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, सहायक धर्मादाय आयुक्त, लातूर, हे वर नमूद केलेला अर्ज यासंबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम १९ अन्वये खालील मुद्द्यांवर चौकशी करणार आहेत:-
(१) वर नमूद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय? आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरूपाचा आहे काय?
(२) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय?
**जंगम मिळकत (वर्णन)**

| अ.क्र. | तपशील | अंदाजे मूल्य |
|---|---|---|
| 1 | Deposit with the President | 1000.00 |
| 2 | Life Membership fees | 3507.00 |
| 3 | NSC No 020185988197 | 1000.00 |

(अ) जंगम मिळकत: रोख रु. 5507/- मात्र
(अक्षरी रुपये पाच हजार पाच शे सात मात्र फक्त)
**स्थावर मिळकत (वर्णन)**

| अ.क्र. | शहर किंवा गांव | सी.एस किंवा महानगरपालिका किंवा सर्वेक्षण क्र. | क्षेत्र | मूल्यांकन | मुदत/कालावधी किंवा स्वरूप | अंदाजे मूल्य |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | None | None | None | None | None | None |

**(ब) स्थावर मिळकत:** रोख रु. ०/- मात्र
(अक्षरी रुपये मात्र फक्त)
सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची लेखी कैफियत ही नोटीस प्रसिद्ध झाल्या तारखेपासून तीस दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्यावर मिळेल अशा रितीने पाठवावी. त्यानंतर आलेल्या कैफियतींचा विचार केला जाणार नाही. तसेच मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.
ही नोटीस माझे सहीनिशी व या कार्यालयाचे शिक्यानिशी आज दिनांक १२-०१-२०२६ रोजी दिली.

स्वाक्षरित/-
**अधिक्षक**
**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय लातूर**

Printed and Published by Dayanand Shankar Jade on behalf of Latur Samachar and Printed at Jade Offset Printers Mitra Nagar Latur and Published at Mitra Nagar Latur.
Editor: Dayanand Shankar Jade Mo. 9422472502, RNI 47034/64, POSTAL NO. L2/RNP/OMD 52/24-26
हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक दयानंद शंकर जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर (महाराष्ट्र) येथे छापून येथेच प्रकाशित केले आहे. मुख्यसंपादकः दयानंद शंकर जडे मो. ९४२२४७२५०२ आरएनआय ४७०३४/६४, पोस्टल क्र. एल२/आरएनपी/ओएमडी-५२/२४-२६